सू. ग्रं
2९६००
क्र.
IRBK-0102970
IRBK-0102970

7 MAY 1975

7 MAY 1976

ोड गोष्टी : भाग तिसरा

# मनूबाबा

" करी मनोरंजन जो मुलांचें,
जडेल नातें प्रभुशीं तयाचें."

लेखक

साने गुरुजी, एम्. ए., अमळनेर

IRBK-0102970

IRBK-0102970

केशव भिकाजी ढवळे : श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई ४

मूल्य चौदा आणे

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ति : १९४२
पुनर्मुद्रण : १९४३,
१९४४, १९४६, १९४९

मुद्रक : बा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, ४०३, शींव, (पूर्व), मुंबई २२
प्रकाशक : के. भि. ढवळे, श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई ४

# दोन शब्द

जॉर्ज इलियट या टोपण नांवाखालीं मेरी ॲन ईव्हान्स या इंग्रज लेखिकेनें अमर अशा कादंबऱ्या लिहिल्या आहेत. या लेखिकेचें मूळचें नांव जवळ जवळ लुप्त होऊन जॉर्ज इलियट याच नांवानें ती प्रसिद्ध आहे. "सिलास मार्नर" ही अप्रतिम कादंबरी १८६१ मध्यें या लेखिकेनें लिहिली. त्या कादंबरींतील गोष्ट "मनूबाबा" या नांवाखालीं मी संक्षेपानें देत आहें. समोर पुस्तक न ठेवतां ती गोष्ट आठवून ही कथा मी लिहीत आहें. तुरुंगांत असतांना कांहीं सुंदर पाश्चिमात्य ग्रंथांतील गोष्टी मी सत्याग्रही तरुणांना काम करतांना व काम करून झाल्यावर सांगत असें. ते मला म्हणत, "तुम्ही सांगतां याच रीतीनें या गोष्टी बाहेर गेल्यावर लिहून काढा. त्या आम्ही वाचूं व आमच्या भोंवतीं मुलें जमतात त्यांनाहि सांगूं." त्या गोष्टी वेळ होईल तेव्हां लिहून काढायचें मीं ठरविलें आहे. त्यांतील ही पहिली आज देत आहें.

सिलास मार्नर कादंबरींत व्यक्तित्वाचा विकास कसा होतो हें सुंदर रीतीनें दाखविण्यांत आलें आहे. मनुष्याचा विकास स्वतःच्या पलीकडे जाण्यांत आहे. ज्या वेळेस जीवनाचा उपयोग एखाद्या ध्येयासाठीं होऊं लागतो, तेव्हांच जीवनाचा विकास होऊं लागतो. हें ध्येय एखाद्या अनाथ मुलाला वाढविणें असेल, किंवा देशाला स्वतंत्र करणें हें असेल. स्वार्थ सुटला, संकुचितपणा सुटला, कीं जीवनाला अर्थ प्राप्त झाला. समुद्राला मिळाल्यानेंच नदीला पूर्णता, त्याप्रमाणें मानव्याची पूजा करण्यांतच जीवनाला पूर्णता आहे. ध्येयहीन जीवन कसें अर्थहीन, नीरस, यंत्रमय, कंटाळवाणें व जड होतें आणि ध्येयार्थी जीवन कसें रसमय, प्रेममय, त्यागमय व चैतन्यमय होतें तें या कादंबरींत उत्कृष्टपणें रेखाटलेलें आहे.

मीं लिहिलेल्या या छोट्या गोष्टींत वाचकांना गोडी आढळेल ती मूळच्या अमर लेखिकेची आहे. नीरसता आढळेल ती माझी आहे. मीं गोष्ट सांगतांना विशेष फेरफार केले नाहींत. आमच्या वातावरणांत शोभेल अशा रीतीनें थोडक्यांत ती गोष्ट मीं मांडली आहे. सर्वांना आवडो.

सानेगुरुजी

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १ | जन्मभूमीचा त्याग | ५ |
| २ | एकाकी मनू | १० |
| ३ | जमीनदार व त्याचे दोन मुलगे | १३ |
| ४ | सोनें परत आलें | २५ |
| ५ | संपतरायाचें लग्न | ३४ |
| ६ | सोनी | ३९ |
| ७ | सत्य लपत नाहीं | ५१ |
| ८ | सोनीचा नकार | ५७ |
| ९ | सोनीचें लग्न | ६७ |
| १० | जन्मभूमीचें दर्शन | ७९ |

२२५७० ७२९

## प्रकरण पहिलें

# जन्मभूमीचा त्याग

बहुळा नदीच्या तीरावर सायगांव म्हणून एक गांव होता. गांव मोठा सुखी व समृद्ध होता. गांवांत नानाप्रकारचे धंदे चालत. शेतकरी, विणकरी, रंगारी, पिंजारी, सोनार, सुतार, लोहार, कुंभार, सर्व प्रकारचे लोक होते. गांवांत भांडण बहुधा होत नसे. मारामारी होत नसे. कोणी कोणाचा हेवादावा करीत नसे. सारे गुण्यागोविंदानें नांदत.

सायगांवची एक विशिष्ट परंपरा होती. त्या गांवचे लोक कधीं राजाकडे न्याय मागण्यासाठीं जात नसत. 'पाप करणारा असेल त्याला देव शिक्षा करीलच' असें ते म्हणत. 'पाप करणाराचें मन त्याला खातच असतें, आणखी शिक्षा कशाला,' असेंहि कोणी म्हणत. जर गांवांत अपराध झालाच, तर सारे लोक देवळांत जमत. कोणीं अपराध केला त्याची चौकशी होई. अपराध करणाराचें नांव देवासमोर सांगण्यांत येई. त्याला दुसरी शिक्षा नसे. गांवांतील सर्व लहान-थोरांना अपराध करणाऱ्याचें नांव कळे. त्याच्याकडे सारे लोक 'हा तो अपराधी' अशा दृष्टीनें बघत. हीच शिक्षा.

सायगांवांत विनू व मनू दोघे मित्र होते. विनूला मनूशिवाय करमत नसे व मनूला विनूशिवाय. मनू एकटा होता. त्याचे आईबाप मरण पावले होते. त्याची लहान बहीण होती. या बहिणीवर त्याचा फार लोभ. परंतु ती बहीणहि देवाघरीं गेली. मनूला अपार दुःख झालें. जीवनांत त्याला अर्थ वाटेना. कोणासाठीं जगावें, कां जगावें, तें त्याला कळेना. परंतु विनूमुळें तो वेडा झाला नाहीं.

मनू विणकर होता. विणण्याची कला त्याच्या बोटांत होती. धाकटी बहीण होती, तेव्हां तिच्यासाठीं तो विणी. पैसे मिळवून बहिणीला नटवी. पुढें-मागें बहिणीचें लग्न करावें लागेल त्यासाठीं तो पैसे सांठवी. परंतु बहीण देवाकडे निघून गेल्यावर मनू फारसें काम करीत नसे.

देवानें त्याच्या जीवनाचें वस्त्र जणुं दुःखाचें विणलें होतें. तें दुःखाचें वस्त्र पांघरून मनू घरीं कोपऱ्यांत बसे. विनू येई तेव्हां मात्र जरासा हसे.

असे कांहीं दिवस गेले. एकदा काय झालें, त्या गांवांत एक परका पाहुणा आला. त्याच्याजवळ बरेचसे पैसे होते. विनूला पैसे पाहिजे होते. विनूच्या मनांत पाप आलें. त्या श्रीमंताचा खून करावा असें त्याच्या मनांत आलें. शेवटीं त्यानें संधि साधून त्या श्रीमंताचा खून केला. त्याची पिशवी त्यानें लांबविली. परंतु खून पचवायचा कसा?

विनूनें रक्तानें माखलेला सुरा मनूच्या उशाशीं ठेवून दिला. मनू झोंपलेला होता. विनू मुकाट्यानें आपल्या घरीं जाऊन पडला. सकाळ झाली. प्रवासी मरून पडलेला दिसला. सर्व गांवभर वार्ता गेली. कोणी केला तो खून? कोणीं केलें तें पाप?

मनू जागा झाला. त्याच्या उशाशीं रक्तानें माखलेला सुरा होता. तो दचकला. तो सुरा हातांत घेऊन तो वेड्यासारखा बाहेर आला. लोक त्याच्याकडे पाहूं लागले.

"हा पहा लाल सुरा, रक्तानें रंगलेला सुरा! कोणाचें हें रक्त? कोठून आला हा सुरा? माझ्या उशाशीं कोणीं ठेवला? लाल लाल सुरा." असें मनू बोलूं लागला.

"यानेंच या प्रवाश्याचा खून केला असेल."

"आणि स्वतः साळसूदपणा दाखवीत आहे."

"त्याला खून करून काय करायचें होतें?"

"देवाला माहीत. एकटा तर आहे. पैसे हवेत कशाला?"

"लोभ का कुठें सुटतो?"

असें लोक म्हणूं लागले. मनूला कांहीं समजेना. तो वेड्याप्रमाणे बघूं लागला.

"मी कशाला कोणाला मारूं? मी आधींच दुःखानें मेलों आहे. मला कशाचीहि इच्छा नाहीं. ना धनाची, ना सुखाची! कोणी

हा सुरा माझ्या उशाशीं आणून ठेवला असावा. स्वतःचें पाप या गरीब मनूवर ढकलीत असावा." मनू म्हणाला.

त्याच्या म्हणण्याकडे कोणी लक्ष देईना. शेवटीं देवळांत सारे लोक जमले. मनू तेथें दुःखानें हजर राहिला. मनूनेंच तो खून केला असावा, असें सर्वांचें मत पडलें. मनूची मान खालीं झाली होती. ईश्वरानें त्याचे आईबाप नेले होते; त्याची बहीण नेली होती. आतां त्याची अब्रूहि परमेश्वर नेऊं पाहात होता. जीवनांतील सर्वांत मोठी मोलवान् वस्तु, तीहि आज जात होती. मनूनें विनूकडे पाहिलें. परंतु विनू त्याच्याकडे पाहीना. आपला मित्र तरी आपणांस सहानुभूति दाखवील असें मनूस वाटत होतें. परंतु तीहि आशा का विफळ होणार?

मनू उभा राहिला. तो म्हणाला, "सर्व गांवानें मला अपराधी ठरविलें आहे. परंतु मी निष्पाप आहें. येथें असलेल्या सर्वांना का मी खुनी आहें असें खरोखर वाटतें? निदान माझा मित्र विनू तरी तसें म्हणणार नाहीं. मित्र मित्राला ओळखतो. माझा स्वभाव विनूला माहीत आहे. विनू, तुझें काय मत आहे तें सांग. साऱ्या गांवानें जरी मला दोषी ठरविलें तरी मला त्याची पर्वा नाहीं. परंतु मित्र दोषी न ठरवो. विनू, तुझ्या डोळ्यांनाहि मी खुनीच दिसतों का? सांग, तुझें मत सांग. तुझ्या मताची मला किंमत आहे. तुझ्यामुळें मी जगलों आहें. या जीवनांत तुझाच काय तो एक स्नेहबंध मला आहे. विनू, बोल. माझ्याकडे बघ. माझे हात कोणाच्या उरांत भोसकतील का सुरा? सुंदर वस्त्रें विणणारे हे हात, ते का कोणाचें जीवनवस्त्र कापून टाकतील? शक्य आहे हें? सांग, मित्रा, तुझें मत सांग. तुला जें खरें खरें वाटत असेल तें सांग."

विनू उभा राहिला. तो म्हणाला, "मनू माझा मित्र आहे. परंतु सत्याशीं माझी अधिक मैत्री आहे. सत्याला मी कधीं सोडणार नाहीं. मनू, माणसाच्या मनांत केव्हां काय येईल त्याचा नेम नसतो. निर्मळ आकाशांत काळे ढग येतील तें काय सांगावें? तुझ्या उशाशीं तो सुरा

होता. तो का दुसऱ्यानें आणून ठेवला ? तूंच तो खून केला असावास, मलाहि असेंच वाटतें. माझ्या मित्रानें खून करावा याचें इतर सर्वांपेक्षां मला अधिक वाईट वाटत आहे. 'खुनी माणसाचा मित्र' असें आता लोक मला म्हणतील व हिणवतील. मनू, काय केलेंस हें ? केलेंस तर केलेंस, परंतु पुन्हा निरपराधीपणाचा आव आणूं बघतोस. हें तर फारच वाईट. हातून पाप झालें. कदाचित् दुःखाच्या लहरींत, उदासीनतेच्या लहरींत, वेडाच्या लहरींत, केलें असशील हें पाप. परंतु तें कबूल करून गांवाची क्षमा मागण्याऐवजीं तूं दंभ दाखवीत आहेस. काय याला म्हणावें ?"

आपल्या मित्राच्या तोंडचे ते शब्द ऐकून मनूचें तोंड काळवंडलें. जेथें त्याची सर्व आशा, तेथेंच निराशा पदरीं आली. ज्याच्यावर आपण प्रेम करतों, त्यानेंहि आपल्याविषयीं गैरसमज करून घ्यावा ह्यासारखें दुनियेंत दुसरें दुःख नाहीं. तो सर्वांत प्रखर असा प्रहार असतो.

सभा संपली. मनूला 'खुनी मनू' म्हणून संबोधण्यांत येऊं लागलें; मनू घरांतून बाहेर पडेना. तो भयंकर मनःस्थितींत होता. एके दिवशीं रात्रीं सायगांव सोडून जाण्याचें त्यानें ठरविलें. तीव्र निराशेनें तो घेरला गेला होता. 'या जगांत न्याय नाहीं, सत्य नाहीं, प्रेम नाहीं, कांहीं नाहीं' असें तो मनांत म्हणाला. जगांत देव नाहीं, धर्म नाहीं. मरतां येत नाहीं म्हणून जगायचें. जग म्हणजे एक भयाण वस्तु आहे, असें त्याला वाटलें.

मध्यरात्रीचा समय. सर्वत्र अंधार होता. मनूच्या मनांत [illegible]च्या अंधाराहूनहि अधिक काळाकुट्ट असा अंधार पसरला होता. पर[illegible] तो उठला. तें पूर्वजांचें घर सोडून तो निघाला. जेथें त्याच्या आईबा[illegible]नीं त्याला वाढविलें, जेथें आपली पोरकी बहीण त्यानें प्रेम[illegible] [illegible] असें तें घर सोडून तो निघाला. त्याला वाईट वाटलें; त्यां[illegible] [illegible] पाणी आलें. परंतु शेवटीं प्रणाम करून त्यानें घराबा[illegible] [illegible]




' तूंच तो खून केला असावास. मलाहि असेंच वाटतें. '

तो रस्ता चालूं लागला. बहुळा नदीच्या तीरावर तो आला. त्या नदींत तो कितीदा तरी डुंबला असेल. मित्राबरोबर पोहला असेल. बहुळेच्या कांठीं एका खडकावर तो बसला. वरतीं तारे चमचम करीत होते. मनूच्या मनांत शेंकडों स्मृति जमल्या होत्या. हृदयांत कालवाकालव होत होती. मोठ्या कष्टानें तो उठला. त्या मध्यरात्रीं बहुळेचें तो पाणी प्यायला. पुन्हां एकदा गांवाकडे वळून त्यानें प्रणाम केला. बहुळेला प्रणाम केला आणि वेगानें निघाला. लांब लांब जाण्यासाठीं मनू निघाला. जेथें त्याला कोणी खुनी असें म्हणणार नाहीं तेथें जावयास तो निघाला. मातृभूमीला राम राम करून तो निघाला.

२२८८

★

प्रकरण दुसरें

# एकाकी मनू

**मनू** आतां रायगांवांत होता. या गांवांत येऊन त्याला पंधरा वर्षें झालीं. परंतु त्याची कोणाशीं मैत्री नव्हती. गांवाच्या टोंकाला त्याची लहानशी झोपडी होती. ही झोपडी म्हणजे त्याचें जग. या झोपडींत त्याचा विणण्याचा माग होता. मनू दिवसभर विणीत असे. चांगला विणकर म्हणून त्याची प्रसिद्धी झाली होती. मोठमोठ्या श्रीमंतांच्या बायकांकडूनहि त्याला काम येई. त्याला भरपूर काम मिळे व मजुरीहि चांगली मिळे.

मिळालेले पैसे मोजणें एवढाच काय तो मनूचा आनंद होता. त्याला दुसरा आनंद नव्हता. सायंकाळ झाली म्हणजे मनूचा माग थांबे. मग तो मिणमिण दिवा लावी. चुलीवर भाकरी भाजी. तें साधें जेवण संपवून तो आपल्या मागाजवळ येई. तेथें जमिनींत पुरलेलें एक लोखंडी भांडें असे. त्यांतील सोन्याचीं नाणीं काढून तो मोजीत बसे. साऱ्या खिडक्या बंद असत. दारें लावलेलीं असत आणि मनू तीं सोन्याचीं नाणीं हातांत घोळवीत बसे. त्या सोन्याच्या मोहरा तो हृदयाशीं धरी. जणुं त्याचें तें जीवनसर्वस्व होतें.

सोन्याचीं नाणीं त्या लोखंडी भांड्यांत मावेनाशीं झालीं. मनूनें दोन चामड्याच्या पिशव्या विकत घेतल्या, त्यांत तीं नाणीं त्यानें ठेविलीं. सोन्याच्या नाण्यांत नेहमीं भर पडत असे. मनू चैन करीत नसे. त्याच्या अंगावर फाटकें वस्त्र असे. तो चांगले पदार्थ खात नसे. ना दुधातुपाचा थेंब. कोरडी भाकरी तो पाण्याबरोबर खाई. सोन्याचें नाणें अधिक कसें पिशवींत पडेल याचीच त्याला अहर्निश चिंता असे.

मनूचें जीवन केवळ यांत्रिक झालें होतें. दिवसभर तो खटक खटक मागाचा आवाज त्याच्या कानांत भरत असे आणि रात्रीं त्या नाण्यांचा आवाज. तिसरा आवाज त्याला माहीत नव्हता. त्याचे डोळे विचित्र

दिसत. ना त्या डोळ्यांत कोणताहि भाव. ते डोळे यांत्रिक झाले होते. त्या डोळ्यांचें पाहाणें अर्थहीन झालें होतें. मनूची मुद्रा फिक्कट झाली होती. तोंडावर ना तेज ना प्रसन्नता. मनू एखाद्या भुतासारखा भासे. गांवांतील लोकांना त्याची भीति वाटे. तरीहि त्याच्याकडे कधीं कधीं बायका आपलीं मुलें घेऊन येत. मुलांचे रोग कसे बरे करावे तें मनूला माहीत होतें. त्याला अनेक औषधें माहीत होतीं. तो साधीं साधीं औषधें सांगे. झाडांचे पाले, वनस्पतींचीं मुळें हींच त्याचीं औषधें. परंतु मुलांचे रोग बरे होत. बायका त्याला धन्यवाद देत. जरी असे धन्यवाद मिळत असले तरी एक प्रकारची मनूबद्दलची भीतिहि बायांना वाटे. कोणी म्हणत, "मनूला भूतविद्या येते. पिशाचें त्याला वश आहेत. म्हणून त्याला रोग बरे करतां येतात. नाहीं तर या बावळटाला कोठली येणार वैद्यकी ?" कोणी म्हणत, "मनू अधांतरीं चालतो. शरीरांतून आपला प्राण वाटेल तेथें नेतो. पुन्हा शरीरांत येतो. त्याला योगविद्या येते." असे नाना तर्कवितर्क त्याच्याविषयीं चालत.

मुलें त्याच्या झोपडींत डोकावत व म्हणत, "तें पहा भूत बसलें आहे. मागावर बसून विणीत आहे. कसा म्हातारा दिसतो नाहीं ?" कोणी त्याला 'ए म्हातारड्या मनू' अशी हांक मारीत. मनू त्यांच्याकडे बघे. मुलें पळून जात.

मनूबद्दल जरी भीति वाटत असली, तरी हा निरुपद्रवी मनुष्य आहे अशी सर्वांची खात्री झाली होती. पंधरा वर्षांत त्याचें कोणाजवळ भांडण नाहीं. कधीं तंटा नाहीं, तक्रार नाहीं. विणाईच्या मजुरीविषयीं घासाघीस नाहीं. जे लोक देत तें तो घेई. लोकांना त्याची करुणा वाटे. एकटा जीव. कोणी सखा ना मित्र. मूल ना बाळ. कसा राहत असेल बिचारा, असें सर्वांना वाटे.

मनूच्या साऱ्या भावना गोठून गेल्या होत्या. त्याचें सारें प्रेम, त्याचा सारा लोभ, त्या सुवर्णमुद्रांत सांठवला होता. आईबाप आपल्या मुलांना कुरवाळतात. मनू तीं सोन्याचीं नाणीं कुरवाळी. हातांत घोळून घोळून

तीं सोन्याचीं नाणीं गुळगुळीत झालीं होतीं. 'शंभर झालीं माझीं नाणीं, आतां सव्वाशें होतील. सव्वाशेंचीं दीडशें व दीडशांचीं दोनशें होतील,' असें तो मनांत म्हणे व त्या मोहरांचें चुंबन घेई.

त्याच्या हृदयांतील ओलावा एखादे वेळेस नकळत प्रकट होई. मनूच्या घरांत फारशा वस्तु नव्हत्या. एक मातीचा घडा होता, तो मनूला फार आवडे. त्या मडक्यावर त्याचा जीव होता. तो घडा घेऊन विहिरीवर जाई व रोज भरून आणी. हलक्या हातानें तो घडा मन स्वच्छ करी. त्या घड्यांतील निर्मळ पाण्याकडे तो बघत राही. 'मनुष्याच्य डोक्यापेक्षां हा घडा निर्मळ आहे. डोक्यांत घाणेरडे विचार येतात परंतु माझ्या या मडक्यांत घाणेरडें पाणीहि निर्मळ होतें' असें तो म्हण

परंतु एके दिवशीं तो घडा फुटला. त्याचे तीन तुकडे झाले. ज मनूचे प्राणच गेले. त्या तीन तुकड्यांत त्याचें त्रिभुवन होतें. त्य तुकड्यांकडे तो पाहात राहिला. इतके दिवस तो घडा त्याच्यासाठ झिजला होता. पंधरा वर्षें त्या घड्यानें निर्मळ जीवन दिलें. तो घ मनूच्या जीवनाचा जणुं एक भाग झाला होता. तो घडा निर्जी नव्हता. तो घडा मनूशीं बोले, मनूशीं हसे. परंतु तो घडा आज गेल एक महान् मित्र गेला. मनूनें आदरानें ते तीन तुकडे उचलून घ आणले. ते तीन तुकडे त्यानें कसेतरी सांधवून तेथें ठेवले. तें जणुं ल घड्याचें स्मारक होतें. ती जणुं आठवण होती. फुटलेल्या घड्या मनूच्या प्रेमानें जणुं पुनर्जन्म दिला. परंतु तो घडा आतां पाण्याच उपयोगी नव्हता.

मनूच्या झोपडींतील साऱ्या वस्तु जणुं सजीव होत्या. तो म गाणें गाई. तें फुटकें मडकें बोले. तीं सोन्याचीं नाणीं म्हणजे परमानंद. त्या खोलींतील वस्तु म्हणजे त्याचे मित्र. तेंच त्याचें कुटुं तींच त्याचीं मुलेंबाळें. अशा रीतीनें मनूचें आयुष्य चाललें होतें. आतां म्हातारा दिसूं लागला. त्याचें वय फार तर चाळीस असे परंतु सारे त्याला " बुढ्ढेबाबा " म्हणून म्हणत.

★

## प्रकरण तिसरें

# जमीनदार व त्याचे दोन मुलगे

**रायगांवांत** दिगंबरराय हा मोठा जमीनदार होता. सारा गांव त्याला मान देई. गांवांत कांहीं तंटाबखेडा झाला, तर त्याचा निवाडा दिगंबरराय करायचे. दिगंबररायांना दोन मुलगे होते. मोठ्या मुलाचें नांव संपतराय व धाकट्याचें नांव ठकसेन. दिगंबररायांची पत्नी मरण पावली होती. घरांत आचारी स्वयंपाक करी. घरांत सारी अंदाधुंदी असे. सारा पसारा. घरांत स्त्री असेल तर व्यवस्था राहाते. स्त्रीशिवाय घराला शोभा नाहीं. सारें ओसाड, उदास व भगभगीत दिसतें.

" संपत, तूं आतां लग्न कर. त्या दलपतरायांची मुलगी इंदुमती तुला साजेशी आहे. त्यांचें घराणेंहि मोठें खानदानीचें आहे. इंदुमतीचेंहि तुझ्यावर प्रेम आहे. तिच्या पित्यानें तिचें कधींच लग्न केलें असतें, परंतु तिचें तुझ्यावर प्रेम आहे असें त्याला कळलें. त्यामुळें तो थांबला आहे. संपत, तूं कां नाहीं होत लग्नाला तयार ? वेळींच सारें करावें. तुझी पंचविशी उलटून गेली. माझें ऐक. मीहि आतां म्हातारा झालों आहें. मरणापूर्वी घराला कळा आलेली पाहूं दे. घरांत सून आली म्हणजे घराला शोभा येईल. घरांत आनंद येईल, व्यवस्थितपणा येईल. हल्लीं घर म्हणजे धर्मशाळा वाटते. घराला घरपणा स्त्रियांशिवाय नाहीं. करतोस का लग्न ? " पित्यानें विचारलें.

" बाबा, थोडे दिवस आणखी जाऊं देत. इंदुमतीचें माझ्यावर प्रेम आहे ही गोष्ट मला माहीत आहे. ती आशेनें आहे. तिची आशा पूर्ण होईल. परंतु कांहीं दिवस थांबा. मी तुमच्या शब्दाबाहेर नाहीं. खरोखर नाहीं. " संपत म्हणाला.

" तूं चांगला आहेस. तो ठकसेन तर वाटेल तें करतो. त्याला कांहीं धरबंधच नाहीं. तूं माझी आशा. तूं कुळाचें नांव राख. तूं कुळाची परंपरा सांभाळ. आपली प्रतिष्ठा जाऊं देऊं नकोस आणि संपत, आतां

घरचा कारभार तूंच पाहूं लाग. हिशेब वगैरे ठेव. जमाखर्च ठेव. चांगला हो. समजलास ना ?" पिता म्हणाला.

"होय बाबा, मी कारभार बघत जाईन. तुमचा त्रास कमी करीन. तुमचें सुख तें माझें." संपत म्हणाला.

एके दिवशीं संपत वसूल गोळा करून येत होता. चारपांचशें रुपयांचा वसूल आला होता. बाबांना केव्हां एकदा सांगूं असें त्याला झालें होतें. इतक्यांत तिकडून धाकटा भाऊ ठकसेन आला. त्याला चुकवून संपत जाऊं बघत होता. परंतु ठकसेन जवळ आलाच.

"दादा, भावाचा असा कां रे कंटाळा करतोस ? तुझ्याशिवाय मला करमत नाहीं. मी कोठें गेलों तरी तुझी आठवण येते आणि पुन्हा मी तुला भेटायला येतों. आज बरेच दिवसांनीं आलों तरीहि मला पाहून तुला आनंद कां होत नाहीं ?" ठकसेनानें विचारलें.

"ठकसेन, बाबांना तूं आवडत नाहींस, म्हणून मलाहि तूं आवडत नाहींस. तूं वाटेल तसा वागतोस. उधळपट्टी करतोस. तुला ताळतंत्र नाहीं. आपल्या घराण्याचा मोठेपणा तुझ्या लक्षांत येत नाहीं. सारे लोक तुला हसतात, नांवें ठेवतात. तुझ्याबरोबर मी राहीन, तर मलाहि नांवें ठेवतील." संपत म्हणाला.

"दादा, तुझें माझ्यावर प्रेम नसलें तरी माझें तुझ्यावर आहे. मला जें जें लागतें तें मी फक्त तुझ्याजवळ मागतों. तूं नाहीं नाहीं म्हणतोस परंतु मला देतोस. तूं वरून नाहीं दाखवलीस तरी मनांत माझ्याबद्दल तुला सहानुभूति आहे. दादा, आज मी अडचणींत आहें. मला तीनशें रुपये पाहिजेत. दे, कोठूनहि दे. नाहीं म्हणूं नकोस." ठकसेन हात धरून म्हणाला.

"कोठून देऊं पैसे ? मागें दिले होते. आज पुन्हा कोठून देऊं ? बाबांना हिशेब द्यायचा आहे. सोड. जाऊं दे मला." संपत रागानें म्हणाला.

"मी तुझा हात सोडणार नाहीं. तूं माझा दादा. तूं माझा मोठा भाऊ. तुझा आधार मी कसा सोडूं ? दादा, तूं पैसे दिलेच पाहिजे. मला नाहीं देणार ? तुझी ती गोष्ट. हं. मी कोणाला ती सांगणार नाहीं. दादाची गुप्त गोष्ट मी कशी कोणाला सांगूं ? दादा म्हणजे कुळाचें भूषण, कुळाची कीर्ति. खरें ना ? मी तुझी गोष्ट माझ्या पोटांत ठेविली आहे. परंतु मला पैसे दे. फक्त तीनशें. आज अधिक नकोत." ठकसेन हसत म्हणाला.

"घे बाबा. तूं तरी एक माझ्या मानगुटीस बसलेला गिऱ्हाच आहेस. पुन्हा नको मागूं." संपत म्हणाला.

"पुन्हा लागले म्हणजे मागेन. दादाजवळ नाहीं मागायचे तर कोणाजवळ ? गिऱ्हा म्हण, भूत म्हण, कांहीं म्हण. पैसे देत जा म्हणजे झालें. तुझी गोष्ट मी कधींही कोणाला सांगणार नाहीं, खरें ना ?" असें म्हणून ठकसेन निघून गेला.

ठकसेनाचे उपद्व्याप सारखे चाललेले असत. त्यानें कुबेराला भिकेस लाविलें असतें. खावें, प्यावें, चैन करावी, यापलीकडे त्याला कर्तव्य नव्हतें. तो रायगांवांत फारसा राहात नसे. पैसे घेऊन बाहेर जाई. तिकडे चैन करावी, रंगढंग करावे. पैसे संपले, कीं तो घरीं परत येई. तो वडिलांना कधीं तोंड दाखवीत नसे. परंतु वडील भावाच्या पाठीस लागत असे. आणि काय असेल तें असो. वडील भाऊ त्याला भीत असे. ठकसेनाच्या हातांत वडील भावाच्या जीवनाची कोणती तरी एक कळ होती. त्यामुळें दादापासून त्याला पैसे उकळतां येत.

ठकसेन तीनशें रुपये घेऊन गेला. परंतु तीन महिनेहि त्याला झाले नाहींत, तों तो पुन्हा आला. पैशासाठीं पुन्हा दादाच्या खनपटीस बसला.

"दादा, मला पांचशें रुपये हवेत या वेळेला." तो म्हणाला.

"दादाला वीक आतां व घे पैसे." संपत म्हणाला.

" दादाला कसें विकूं ? दादाची घोडी आहे ती फार तर विकीन. तुझी घोडी विकली तर पांचशें रुपये सहज मिळतील. देतोस मला तुझी घोडी ? दे. उद्यां बाजारांत विकीन. दादा, तूं माझा आधार. आणि तुझी ती गोष्ट मी कोणाला सांगणार नाहीं. माझें तुझ्यावर प्रेम आहे. खरेंच." ठकसेन कावेबाजपणें हसून म्हणाला.

" घोडी कशी विकायची ?" संपत संतापून म्हणाला.

" कशी म्हणजे ? बाजारांत. मी विकीन. तूं नको येऊं. तुला तो कमीपणा वाटेल. नेऊं ना तुझी घोडी ?" त्यानें पुन्हा विचारलें.

" बाबा काय म्हणतील ?" संपत खिन्नतेनें म्हणाला.

" जरा रागावतील. मग गप्प बसतील. मी घेऊन जातों घोडी. उद्यां गुरांचा बाजार आहे शेजारच्या गांवीं. तेथें विकीन. माझी अडचण भागेल. माझें तुझ्यावर प्रेम आहे. खरेंच." असें म्हणून ठकसेन निघून गेला.

शेजारच्या गांवीं गुरांचा बाजार भरला होता. सुंदर सुंदर घोडे तेथें विक्रीसाठीं आणलेले होते. ठकसेनहि घोडी घेऊन उभा होता. ती घोडी आसपास प्रसिद्ध होती. पूर्वी अनेकांनीं ती घोडी विकत घेण्यासाठीं खटपट केली होती. परंतु संपतरायनें ती कधींहि दिली नाहीं.

घोडीभोंवतीं लोकांची गर्दी झाली.

" हजार रुपये मागें एकजण देत होता. घोडी म्हणजे घोडी आहे." ठकसेन म्हणाला.

"कोणाला पाहिजे तुमची घोडी ? पांचशेंसुद्धां कोणी देणार नाहीं." एकजण म्हणाला.

" आपली वस्तु आपण होऊन बाजारांत आणली म्हणजे तिची किंमत कमी होते." दुसरा कोणी म्हणाला.

" खरोखरच विकायची आहे का ?" तिसऱ्यानें प्रश्न केला.

" योग्य किंमत आली तर विकीन. नाहीं तर कांहीं अडलें नाहीं." ठकसेन कुऱ्यानें म्हणाला.

"लोकांचेंहि अडलें नाहीं. परंतु संपतरायांची घोडी तुम्हांला कशी मिळाली?" कोणीं तरी प्रश्न केला.

"आम्ही दोघे भाऊ आहोंत. मोठ्या भावानें ही घोडी मला बक्षीस दिली आहे." ठकसेन म्हणाला.

"बक्षीस मिळालेली वस्तु का कोणी विकतो!" एकानें विचारलें.

"अडचण भासली म्हणजे भावना दूर ठेवाव्या लागतात." दुसरा म्हणाला.

"तुमची घोडी साडेपांचशेंला देतां का? पहा पटत असेल तर. उद्यां घोडी आमच्या घरीं घेऊन या. घरीं पैसे देईन. आज सौदा ठरवून ठेवूं." एकजण निश्चित स्वरांत म्हणाला.

"ठीक. साडेपांचशेंला देऊन टाकतों. तुम्हांला उत्कृष्ट घोड्यांचा शोक आहे. ही घोडी तुमच्याकडे जाण्यांत औचित्य आहे. केवळ पैशांकडेच बघून चालत नाहीं." ठकसेन म्हणाला.

सायंकाळ होत आली. लोक घरोघर जाऊं लागले. ठकसेन आपल्या घोडीवर बसून निघाला. उद्यां घोडी दुसऱ्याच्या घरीं जाणार होती. दादानें ठकसेनाला त्या घोडीवर कधीं बसूं दिलें नव्हतें. आज घोडी दौडवावी, हौस फेडून घ्यावी असें ठकसेनाच्या मनांत आलें. त्यानें घोडीला टांच मारली. घोडी वाऱ्याप्रमाणें निघाली. घोडी बेफाम सुटली. ठकसेनाला ती आवरेना. बाहेर अंधार पडूं लागला. ठकसेनाला समोर दिसेना. शेवटीं घोडी एकदम एका खळग्यांत पडली! ठकसेन बाजूला पडला. तो चांगलाच आपटला. घोडी तर दगडावर आपटून तात्काळ गतप्राण झाली. ठकसेन लंगडत कण्हत घोडीजवळ गेला. घोडीचें प्रेत तेथें होतें. आतां पैसे? साडेपांचशें रुपये कोठून मिळणार? आज मेली ती उद्यां विकल्यावर मरती तर! घोडी मेली त्याचें ठकसेनाला कांहींच वाटलें नाहीं. परंतु पैशांचा प्रश्न त्याच्यासमोर होता.

तो उठला. अंधारांतून चांचपडत निघाला. हातांत सोन्याच्या मुठीचा चाबूक होता. गांव जवळ आला होता. आतां त्याला प्रथम

मनू विणकराचें घर लागलें असतें. मनू! भुतासारखा राहणारा मनू! मनूजवळ खूप पैसा आहे. सोन्याच्या नाण्यांनीं भरलेल्या थैल्या आहेत. मनूच्या घरीं आपण दरोडा घातला तर? मनूला एकदम जाऊन भिवविलें तर? त्याला धाकदपटशा दाखवला तर? मनूचे पैसे लांबवावे, लुबाडावे, असा विचार ठकसेनाच्या मनांत आला. त्याला तीं सोन्याचीं नाणीं दिसूं लागलीं. तो जणुं स्वप्नांत होता.

इतक्यांत एकाएकीं वादळ उठलें. गार वारा वाहूं लागला. आकाशांत ढग जमले. अंधार अधिक दाटला. ठकसेन झपझप चालूं लागला. मनू विणकराची झोपडी आली. झोपडीचें दार उघडें होतें. आंत चुलींत मंदाग्नि पेटत होता. दिवा मिणमिण करीत होता. परंतु मनू कोठें होता? तो तेथें नव्हता. आपलें द्रव्य सोडून तो कोठें गेला?

ठकसेनानें आंत डोकावून पाहिलें. आंत कोणी नव्हतें. तो पटकन् झोपडींत शिरला. परंतु तेथें त्याला पेटीबिटी दिसेना. कोठें आहे या कृपणाचा ठेवा? ठकसेन पाहूं लागला. तो त्या मागाजवळ गेला. तेथें त्याला उखळलेलें जरा दिसलें. त्यानें भराभर माती उखळली. भुसभुशीत होती माती. थोडीशी माती काढतांच हाताला त्या दोन पिशव्या लागल्या. ठकसेनानें त्या बाहेर काढल्या. हेंच तें द्रव्य. जड होत्या पिशव्या. त्यानें त्या पिशव्या उचलल्या. माती नीट करून ठेवून तो बाहेर पडला. अंधारांत निघून गेला.

बाहेर वादळ फारच जोरांत सुरू झालें. कडाड कडाड मेघ गरजूं लागले. गाराहि पडूं लागल्या. मोठ्या आंब्याएवढाल्या गारा. गारांचा पाऊस. असा पाऊस कधीं पडला नव्हता. मनू बाहेर गेला होता. दोरा विकत आणण्यासाठीं गेला होता. सकाळीं नवीन ठाण लावावयाचें होतें. त्यासाठीं दोरा हवा होता म्हणून तो गेला होता. तो तिकडेच अडकला. आपण पटकन घरीं येऊं असें त्याला वाटत होतें. कडी न लावतांच तो गेला होता. त्याच्या वरची सर्वांना भीति वाटे. कोणीहि

त्याच्या वाटेस जात नसे. आपल्या घरीं कोणी चोर येईल अशी शंकाहि मनूच्या मनांत कधीं येत नसे.

वादळ जरा थांबलें. गारांचा वर्षाव थांबला. पाऊस पडतच होता. मनू घरीं येण्यास निघाला. पावसांतून भिजत तो घरीं आला. दुसरें कोरडें नेसून तो चुलीजवळ गेला. तो गारठला होता. आतां ऊब आली. त्यानें जेवण केलें आणि झोपडीचें दार लावून, खिडक्या लावून तो आपल्या त्या ठेव्याजवळ आला. मिणमिण करणारा दिवा जवळ होता.

मनू माती उकरूं लागला. नेहमींप्रमाणें त्यानें माती दूर केली. परंतु [illegible] कोठें आहेत? पिशव्या नाहींत. तो घाबरला. त्यानें हातभर [illegible] पाहिलें, दोन हात खणलें. परंतु पिशव्या नाहींत! त्यानें सर्वत्र [illegible]. कोपरान् कोपरा शोधला. परंतु सोनें नाहीं. कोठें गेलें सोनें? पंधरा वर्षें प्रेमानें सांठविलेलें सोनें. बाहेरच्या गारठ्यानें मनू गारठला नाहीं. परंतु पैशांची ऊब नाहींशी होतांच तो कांपूं लागला. आपले प्राण जाणार असें त्याला वाटलें. त्यानें आपलें हृदय घट्ट धरून ठेवलें. छाती फुटणार असें त्याला वाटलें. तो मध्येंच डोळे फाडफाडून सर्वत्र पाही. मध्येंच तो डोळे मिटी. 'माझें सोनें,' 'माझें सोनें,' असें म्हणून तो रडूं लागला.

पाऊस थांबला होता. परंतु मनू विणकराच्या डोळ्यांतून पाऊस पडत होता. आकाश निर्मळ झालें, परंतु मनूचें हृदय अंधारानें भरलें. तो वेड्यासारखा झाला. 'माझें सोनें, माझें सोनें,' करीत तो झोपडीच्या बाहेर पडला. दिगंबररायांकडे दाद मागावी असें त्याच्या मनांत आलें. रडत रडत तो निघाला. दिगंबरराय आज घरीं नव्हते. त्यांचा मोठा मुलगा संपतराय तोहि घरीं नव्हता. ते शेजारच्या कोणत्याशा गांवीं मेजवानीला गेले होते. त्यांच्या घरीं गडीमाणसें होतीं. कारभारी होते. त्यांच्या गप्पागोष्टी चालल्या होत्या. कोणी खेळत होते.

इतक्यांत "माझें सोनें गेलें, माझे प्राण गेले. द्या हो माझें सोनें. आणा हो शोधून. कसें गेलें माझें सोनें? कोणीं नेलें?" असें ओरडत

मनू तेथें आला. वाड्यांतील सारी मंडळी तेथें जमली. त्यांना आधीं कांहीं कळेना. सारा गोंधळ.

" हें पहा मनू, नीट सारें सांग." प्रमुख म्हणाला.

" काय नीट सांगू ? मी दोरा विकत आणण्यासाठीं बाजारांत गेलों होतों. पावसामुळें दुकानांत अडकलों. परंतु पाऊस संपतांच घरीं गेलों. घरीं जाऊन माझी पिशवी पाहातों तों नाहीं. दोन पिशव्या होत्या. दोनशें बहात्तर मोहरा होत्या. लवकरच तीनशें झाल्या असत्या. कितीदां तरी या बोटांनीं मी त्या मोजीत असें. माझी मोहर मी अंधारांतहि ओळखीन. गेल्या, साऱ्या गेल्या. तुम्ही जा. शोधा चोर. कोठें गेला चोर ? काय करूं मी ? माझा सारा आनंद गेला. माझी शक्ति गेली. छे ! पायानें चालवत नाहीं. आणा हो माझ्या पिशव्या."

असें म्हणून तो म्हातारा विणकर तेथें मटकन खालीं बसला. त्या सर्वांना त्याची कींव आली. मनूनें कधीं गोडगोड खाल्लें नाहीं. चांगलें वस्त्र ल्यायला नाहीं. गाडीघोडा ठेवला नाहीं. चैन त्याला माहीत नव्हती. दिवसभर तो काम करी. काम करून त्यानें पैसे जमविले. निढळाच्या श्रमाचे पैसे. परंतु सारे गेले. त्या पैशांचा काय होता त्याला उपयोग ? परंतु ते जवळ असणें, त्यांचा स्पर्श बोटांना होणें, त्यांचें दर्शन डोळ्यांना होणें, यांतच त्याचा आनंद होता. पैशांचा दुसरा उद्देश नव्हता. दुसरें प्रयोजन नव्हतें. ते पैसे म्हणजे मनूबाबाचें एक प्रेमाचें जणुं स्थान होतें.

" तुम्हांला कोणाचा संशय येतो का ?" त्या प्रमुखानें विचारलें.

" हा तुमचा येथील गडी भिकू याचा मला संशय येतो. तो मागें एकदा म्हणाला होता, कीं तुझे पैसे चोरले पाहिजेत. याला विचारा." मनू म्हणाला.

भिकू एकदम संतापला.

" थोबाड फोडीन बुड्ढ्या. मीं का तुझे पैसे चोरले ? संध्याकाळपासून

मी येथें आहें. आणि तुझे पैसे तर आतां गेले. वा रे वा. कधीं थट्टेंत बोललों असेन तर त्यासाठीं का माझ्यावर आळ घेतोस?" भिकू रागानें म्हणाला.

"हें पहा मनू, असें उगाच कोणाचें नांव घेऊं नकोस. भिकू प्रामाणिक माणूस आहे. आज किती तरी वर्षें ह्या बड्या वाड्यांत तो काम करीत आहे. परंतु त्यानें कधींहि कशाला हात लावला नाहीं." प्रमुख म्हणाला.

"भिकू, मला क्षमा कर. परंतु माझें सोनें? कोणीं नेलें माझें सोनें? शोधा हो तुम्ही. पंधरा वर्षांची सारी कमाई गेली. अरेरे! आतां कसा जगूं? कसा राहूं? जा, कोणी शोधा." तो काकुळतीनें म्हणाला.

कांहीं लोक कंदील घेऊन गेले. कोणी हातांत काठ्या घेतल्या. कोणी या बाजूला गेले, कोणी त्या. परंतु चोर सांपडला नाहीं. लोक घरोघर झोपले होते. हवेंत गारठा होता. संशोधन करणारी मंडळी परत आली.

"सांपडलें का सोनें? माझें सोनें?" मनूनें विचारलें.

"चोराचा पत्ता नाहीं. सर्वत्र शोधलें. जिकडे तिकडे चिखल झाला आहे. नद्यानाल्यांना पूर आले आहेत. शक्य तो प्रयत्न केला. मनू, झालें तें झालें. असेल आपलें तर परत मिळेल." तो प्रमुख म्हणाला.

"माझेंच होतें. माझ्या श्रमांचें होतें. सारखें मी काम करीत असें. कधीं विश्रांति घेतली नाहीं." मनू रडत म्हणाला.

"जा आतां घरीं. काळजी करून काय होणार?" प्रमुख म्हणाला

मनू आपल्या झोपडींत गेला. तो तेथें बसून राहिला. शून्य दृष्टीनें तो सर्वत्र पाहात होता. हळुहळू त्याचे डोळे मिटले. पहाटे पहाटे त्याला झोप लागली.

सकाळीं सर्व गांवांत चोरीची वार्ता पसरली. सारा गांव मनूच्या झोपडीपाशीं जमा झाला. जो तो हळहळत होता. प्रत्येकाला वाईट

वाटत होतें. मनू खिन्न होऊन बसला होता. त्याचे आधींच खोल गेलेले डोळे एका रात्रींत आणखी खोल गेले. त्याच्या तोंडावर प्रेतकळा आली होती. एक शब्दहि त्याला बोलवेना.

मनूच्या झोपडीपासून थोड्याशा अंतरावर सखाराम राहात असे. सखाराम मोलमजुरी करी. त्याच्या बायकोचें नांव साळूबाई. साळूबाई मोठी प्रेमळ होती. दुसऱ्याची मनःस्थिति तिला पटकन समजे. तिला एक मुलगा होता. असेल पांच-सहा वर्षांचा. मोठा गोड मुलगा. तो आईबापांचा फार आवडता होता. त्याचें नांव रामू.

साळूबाई रामूला बरोबर घेऊन मनूकडे आली. गर्दी आतां ओसरली होती. लोक आपापल्या उद्योगाला निघून गेले होते. मनू तेथें एका जुन्या आरामखुर्चीत विषण्णपणें पडला होता.

" वाईट झालें हो. कसे नेववले पैसे तरी. वाईट नका वाटून घेऊं. वाईट वाटून काय करायचें मनूदादा ? आणि तुम्ही भारीच पैशाच्या मागें लागतां. कधीं देवळांत जात नाहीं, देवदर्शन करीत नाहीं. एकादशी नाहीं. सोमवार नाहीं. रोज उठून मेलें तें अक्षै काम ! काम ! मनूदादा, काम करावें परंतु रामाला विसरूं नये. देवाला विसरूं नये. आतां देवाला विसरूं नका. कधीं भजनाला जात जा. तुम्हांला येतें का भजन ? या आमच्या रामूला येतात अभंग. रामू, दाखव रे म्हणून अभंग. हसतोस काय लबाडा ! म्हण कीं. मनूबाबांना म्हणून दाखव." साळूबाई बोलत होती.

रामू लाजला. त्यानें आपले डोळे दोन्ही हातांनीं मिटले. पुन्हा ते हळूच उघडून त्यानें बघितलें. नंतर आईच्या पाठीमागें जाऊन लपला.

" म्हण ना रे. लाजायला काय झालें ?" आई म्हणाली.

रामू अभंग म्हणूं लागला.

आतां तरी पुढें हाचि उपदेश
नका करूं नाश आयुष्याचा
सकलांच्या पायां माझें दंडवत
आपुलालें चित्त शुद्ध करा
हित तें करावें देवाचें चिंतन
करूनियां मन एकविध
तुका म्हणे हित होय, तो व्यापार
करा, काय फार शिकवावें

त्या लहान मुलाची वाणी निर्मळ होती. ती वाणी गोड वाटत होती. अभंग म्हणून झाल्यावर रामूनें आईच्या गळ्याला एकदम मिठी मारली. तिनें त्याचा प्रेमानें मुका घेतला.

"मीहि माझ्या सोन्याच्या त्या मोहरांचे असेच मुके घेत असें. त्या मोहरा म्हणजे जणुं माझीं मुलें. त्यांचे मी मुके घेत असें. त्यांना मी पोटाशीं धरीत असें. आतां कोणाला धरूं पोटाशीं, कोणाचे घेऊं मुके?" मनूबाबा म्हणाला.

"या माझ्या रामूचे घ्या." साळूबाई म्हणाली.

"रामूचे?" मनूबाबानें आश्चर्यानें विचारलें.

"हो. रामू म्हणजे आमचें सोनें. आम्ही मोलमजुरी करतों. परंतु कोणासाठीं? या रामूसाठीं. आमचे पैसे या रामूसाठीं. रामू आमची धनदौलत. बोलती चालती धनदौलत. हसणारी खेळणारी धनदौलत." असें म्हणून साळूबाईनें रामूला पोटाशीं धरलें. थोडा वेळ कोणी कांहीं बोललें नाहीं.

"आज मनूबाबा, तुम्ही किनई, आमच्याकडेच जेवायला या. घरीं करूं नका. आणि आतां हें थालीपीठ आणलें आहे तें खा. आज सकाळीं कामाला जातांना म्हणाले, 'थालीपीठ कर.' केलें. पुरुषांच्या पोटांना निरनिराळे पदार्थ हवे असतात. आम्हां बायकांना कांहींहि

चालतें. घ्या हें थालीपीठ. नाहीं म्हणूं नका. तुम्ही बरेच दिवसांत खाल्लें नसेल." साळूबाई म्हणाली.

तिनें म्हाताऱ्याच्या हातांत थालीपीठ दिलें. पानांत गुंडाळलेलें होतें तें. मनूबाबा त्याच्याकडे पाहात राहिला. त्यानें एक तुकडा मोडला व रामूला दिला.

"त्याला कशाला? तो सारें खाईल. लबाड आहे तो. तुम्हीच खा. मी आतां जात्यें. आणि तुम्ही किनई, मनूबाबा, फार नका काम करीत जाऊं. जरा हसत बोलत जा. देवदर्शनाला जात जा. भजन करा. समजलेत ना?" असें म्हणून साळूबाई रामूला घेऊन निघाली.

मनूबाबा खुर्चीतच होता. गांवांतील किती तरी मंडळी येऊन गेली. परंतु साळूबाईचें बोलणें किती साधें, किती प्रेमळ! त्याच्या मनावर त्याचा परिणाम झाला. त्याच्या त्या खोल गेलेल्या डोळ्यांतून पाणी येणार होतें. परंतु मोठ्या कष्टानें तें त्यानें आवरलें. गेल्या पंधरा वर्षांत त्याच्या डोळ्यांतून कधीं पाणी आलें नव्हतें. गेल्या पंधरा वर्षांत त्याच्या हृदयाला भावनांचा स्पर्श झाला नव्हता. स्वतःला हृदयाची जाणीवच जणुं त्याला नव्हती. परंतु आज त्याला स्वतःला हृदय असल्याची जाणीव झाली. त्यालाहि गोड गोड अभंग आठवूं लागले. आपण एके काळीं देवळांत जात असूं, देवासमोर बसत असूं, तें त्याला आठवलें. हृदयाचें बंद दार जरासें किलकिलें झालें. तें दार गंजून गेलें होतें. परंतु साळूबाईच्या शब्दांतील स्नेहानें गंज निघून गेला. दार जरा उघडलें. थोडासा प्रकाश हृदयांत शिरला.

★

## प्रकरण चौथें

# सोनें परत आलें

**मनूबाबानें** पुन्हा दुप्पट जोरानें काम करण्यास सुरुवात केली. काम करतां करतां पूर्वींच्या मोहरा त्याला एकदम आठवत व त्याचा धोटा तसाच राही. परंतु पुन्हा त्याला जोर येई. गेलें तर गेलें. रात्रंदिवस काम करून पुन्हा मिळवूं. पुन्हा मोहरा जमवूं. पुन्हा रात्रीं मी मोजीत बसेन, या बोटांनीं त्यांना कुरवाळीन, तें सोनें हृदयाशीं धरीन. मध्येंच तो निराशेचा, दुःखाचा सुस्कारा सोडी. परंतु पुन्हा निश्चय करून धोटा फेकी. आतां रात्रीची झोंपहि त्यानें कमी केली. आधीं त्याला झोंप फारशी येतहि नसे. तें सोनेंच त्याला सारखें दिसे. ध्यानीं मनीं सोनें. रात्रींसुद्धां तो विणीत बसे. रात्रींहि खटक खटक आवाज चाले. तुटलेला धागा एखादे वेळेस त्याला रात्रीं दिसत नसे. परंतु तो कष्टानें तो शोधी व सांध करी. सोन्याची भेट व्हावी म्हणून पुन्हा अशी तपश्चर्या अहोरात्र सुरू झाली. काळपुरुष ज्याप्रमाणें जीवनाचें विराट् वस्त्र रात्रंदिवस विणीत असतो, त्याप्रमाणें मनूबाबा रात्रंदिवस ठाण विणीत बसे.

असें करतां करतां दिवाळी आली. गांवांत सर्वत्र आनंद होता. घरोघर करंज्या, अनरसे चालले होते. प्रत्येक घरासमोर सुंदर रांगोळ्या काढलेल्या होत्या. रात्रीच्या वेळीं हजारों दिवे रांगेनें लावले जात होते. मोठी मौज दिसे. ते सहस्रावधि दिवे पाहून प्रसन्नता वाटे.

"मनूबाबा, दिवाळीचे यंदा घरीं चार दिवे लावा. इतक्या वर्षांत लावले नाहींत, आज तरी लावा आणि उद्यां लक्ष्मीपूजन. कदाचित् उद्यां तुमचें गेलेलें सोनें परत येईल. आपोआप गेलें. आपोआप परत येईल. असें एखादे वेळेस होतें. केवळ सोन्यासाठीं वेडे नका होऊं. असें जणुं देवाला तुम्हांला शिकवावयाचें असेल. सोन्यापेक्षांहि सुंदर अशा पुष्कळ गोष्टी जगांत आहेत. नुसतें सोनें जमवून काय कामाचें? तें कोणाच्या उपयोगीं आलें तर उपयोग. नाहीं तर दगड नि सोनें-

सारखीच किंमत. ती बाहेर माती पडली आहे, तसें तुमचें सोनें घरांत पडलेलें होतें. देव हें तुम्हांला शिकवूं पहात होता. देव दयाळू आहे. कदाचित् तुमचें सोनें परत येईल. तें येवो, न येवो. परंतु चार पणत्या लावा. दिव्यांच्या ज्योति सोन्यासारख्या झळकतात. उद्यां लक्ष्मीपूजनाच्या दिवशीं तर चार दिवे लावा आणि ह्या सांजोऱ्या व हे अनरसे मीं आणले आहेत, ते ठेवा. रामूसाठीं सारें सारें करावें लागतें. सण सर्वांचा आहे. गरिबी असली तरीहि सण साजरा करावा. थोडें गोडधोड करावें. आनंद करावा. खरें ना मनूबाबा ?'' साळूबाई म्हणाली.

ती निघून गेली. दुसरे दिवशीं मनूबाबानें खरेंच चार दिवे लावले. सुंदर पणत्या झळकूं लागल्या. मनूबाबानें आपली झोपडी झाडून स्वच्छ केली. 'आज गेलेली लक्ष्मी परत येईल. हो, येईल. माझ्या प्रेमाचे, माझ्या श्रमांचे होते ते पैसे. त्या माझ्या मोहरा परत येतील. तें सारें सोनें परत येईल. तें मी हृदयाशीं धरीन.' असे विचार त्या विणकऱ्याच्या मनांत घोळत होते.

गांवांत लक्ष्मीपूजनाचा महोत्सव सुरू होता. दिगंबररायांकडे तर सर्वांत मोठा उत्सव. या दिवशीं त्यांच्याकडे गांवांतील सारे लोक जमत. आसपासच्या खेड्यापाड्यांतील मित्र येत. त्यांचीं कुळेंहि येत. बैठका घातलेल्या होत्या. तक्क्ये लोड होते. सुंदर समया तेवत होत्या. पानसुपारीचीं तबकें होतीं. मंगल वाद्यें वाजत होतीं. अत्तर, गुलाब होते. बार वाजत होते. दारूकाम सोडलें जात होतें. संपतराय सर्वांचें स्वागत करीत होता. दिगंबरराय पूजा करीत होते. ठकसेन त्या वादळाच्या दिवसापासून कोठें गेला तो गेला. मेलेली घोडी मात्र आढळली. परंतु ठकसेनाचा पत्ता नाहीं. त्याच्यावर कोणाचें फारसें प्रेम नव्हतेंच. त्यामुळें तो घरीं नव्हता तरी कोणाला रुखरुख वाटली नाहीं.

दिगंबररायांकडे दलपतराय व त्यांची मुलगी इंदुमती हींहि आलीं होतीं. इंदुमती प्रेमानें संपतकडे बघत होती. त्यालाहि आनंद होत



“ चला ना बाबा !” इंदुमती पित्याला म्हणाली. [ पृष्ठ २७

होता. संपतच्या वडिलांना नमस्कार करून दलपतराय म्हणाले, "दिगंबरराय, लक्ष्मीपूजन तर केलेंत. परंतु घरांत गृहलक्ष्मी केव्हां आणणार? आमची इंदु तुमच्या संपतलाच द्यायची. दोघांचा जोडा किती शोभतो! आपण दोघे म्हातारे झालों. या दोघांचे हात एकमेकांच्या हातांत देऊं आणि आपण डोळे मिटूं."

"दलपतराय, माझीहि हीच इच्छा आहे. येत्या मार्गशीर्षांत करून टाकूं लग्न. सारें वेळींच झालें पाहिजे. ऐकलेंसना संपत?" पिता म्हणाला.

"चला ना बाबा!" इंदुमती पित्याला म्हणाली.

"अग, आतां या घरांतच तुला राहायला यावयाचें आहे. येथेंच रमायचें आहे. लवकर चला कां म्हणतेस?" पित्यानें विचारलें.

"ती लाजते आहे. आपल्या बोलण्यानें दोघांना मनांत गुदगुल्या होत असतील. परंतु वरून निराळें दाखवायचें. प्रेमाची ही रीतच असते. फूल हळुहळू फुलतें. लाजत लाजत भीतभीत फुलतें. खरें ना?." दिगंबरराय म्हणाले.

जगांत दिवाळी चालली होती. लक्ष्मीपूजनें होत होतीं. लाखों पणत्या पाजळल्या जात होत्या. जणुं आकाशांतील सारे तारेच पृथ्वीवर आले होते. परंतु त्या आनंददायक चार दिवसांत जगांतील दुःखी जीव काय करीत होते? कांहीं दुःखें अशीं असतात, कीं तीं आपण कधींहि विसरूं शकत नाहीं. उलट तीं दुःखें अशा मंगल प्रसंगीं अधिकच तीव्रतेनें भासतात.

ती पहा एक अनाथ स्त्री. एका लहान मुलाला वक्षःस्थळाशीं धरून ती जात आहे. तिच्या अंगावर फाटकें लुगडें आहे. तिचें हृदयच फाटलेलें आहे. डोळ्यांतून पाणी गळत आहे. ती तरुण आहे. ती सुंदर आहे. परंतु तिचें तारुण्य व तिचें सौंदर्य कळाहीन दिसत आहे. जगानें तिची वंचना केली आहे. कोणी तरी पाप्यानें तिला फसविलें आहे. भोळा जीव. ती विश्वासून होती. आपला पति आपणांला एके

दिवशीं घरीं नेईल अशी तिला आशा होती. परंतु किती दिवस आशा खेळवायची ? सुंदर मूल झालें. मूल वर्षाचें होत आलें तरी पति स्वगृहीं नेईना. जगांत कसें राहावयाचें ? लोक कुजबुजूं लागतात. ती टीका कशी सहन करावयाची ? आणि निष्पाप मनाला तर फारच कष्ट होतात.

आपलें मूल घेऊन ती तरुणी निघाली. पायीं निघाली. चालून चालून तिच्या पायांना फोड आले. एका तीव्र भावनेनें ती चालत होती. "आज त्यांच्या घरीं लक्ष्मीपूजन असेल. मोठा थाटमाट असेल. समारंभ होत असेल. शेंकडों स्त्रीपुरुष आले असतील. अशा वेळेस तेथें जाऊन मी उभी राहीन. साऱ्या जगासमोर त्यांचें पाप उघड करीन. त्यांच्या आनंदांत विष ओतीन. मी त्यांची गृहलक्ष्मी. परंतु मला इकडे रडत ठेवतात. मी गरीब घराण्यांतील असल्यें म्हणून काय झालें ? गरिबांना का अब्रू नसते ? मी गरीब होतें, तर आले कशाला माझेजवळ ? केवळ का माझी कातडी पाहून भुलले ? किडे मेले. दुष्ट आहे पुरुषांची जात. मला पण सूड घेऊं दे. साऱ्या जगासमोर त्यांचें हिडिस स्वरूप उघडें करत्यें. लक्ष्मीपूजनाचे दिवे तेवत असतील. प्रकाश पसरला असेल. अशा सुंदर प्रकाशांत त्यांचीं कृष्णकृत्यें जगासमोर मांडत्यें. जगाला ओरडून ओरडून सांगेन..."

परंतु तिच्या त्या तीव्र भावनेची शक्ति कमी पडली. पाय थकले. संकल्पशक्तीनें पाय कांहीं वेळ चालत होते. परंतु पोटांत अन्न नाहीं. पाऊल कसें उचललें जाणार ? बाहेर अंधार पडला. किती लांब आहे अजून गांव ? तिला कांहीं कल्पना नव्हती.

रायगांवांतील लोक आतां झोपले होते. दिवे विझून गेले होते आणि गार गार वारा सुटला होता. अंगाला झोंबणारा वारा. कडाक्याची थंडी. अशी थंडी कधीं पडली नव्हती. मनूबाबा जागा होता. त्यानें दार उघडें ठेवलें होतें. तो पुनः पुन्हा दाराशीं येई व आपलें सोनें परत आलें का पाही. दारांत तो उभा राही व शून्य दृष्टीनें दूरवर बघे.

मग तो गार वारा अंगाला लागला म्हणजे तो पुन्हा खुर्चीत येऊन पडे. परंतु त्याला झोप येत नव्हती. त्याच्या पणत्या विझून गेल्या. फक्त एक पणती अद्याप तेवत होती. मनूबाबानें आतां दार लावून झोपायचें ठरविलें. तो दाराजवळ गेला. परंतु दार लावण्याचें विसरला. पुन्हा विचारांतच मग्न झाला. शेवटीं तो अंथरुणांत येऊन पडला. परंतु थंडी लागत होती. त्याच्या घरांत भरपूर पांघरूण नव्हतें. तो उठला. त्यानें लाकडें पेटवलीं. त्यांच्याशीं तो शेकत बसला. विस्तव सोन्याप्रमाणें चमकत होता. हें आपलें सोनें, असें मनूबाबाला वाटलें व तो त्या निखाऱ्यांस हात लावणार होता. पुन्हा त्याला भान आलें.

मनूबाबा अशा मनःस्थितींत असतांना त्याच्या झोपडीपासून थोड्याशा अंतरावर निराळा प्रकार होत होता. ती तरुणी अगदीं गळून गेली. तिची सर्व आशा मेली. आतां फक्त स्वतः ती मरायची उरली होती. तिच्याजवळ एक कुपी होती. त्या कुपींतील कांहींतरी ती प्यायली. मातृप्रेम म्हणत होतें, "पिऊं नको." निराशा म्हणे, " पी. जगण्यांत अर्थ नाहीं." तें कांहींतरी पिण्यापूर्वीं तिनें आपल्या मुलाला एकदा शेवटचें पाजलें. तिनें त्याचे मुके घेतले. नंतर त्या बाळाला तिनें आपल्या फाटक्या लुगड्याचा पदर फाडून त्यांत गुंडाळलें. त्याला थंडी लागूं नये म्हणून तिनें मरतां मरतां काळजी घेतली. नंतर त्या मुलाला दोन्ही हातांनीं घट्ट धरून ती चालत होती. हळुहळू त्या पेयाचा पूर्ण परिणाम झाला. किती वेळ चालणार ? आतां एक पायहि उचलेना. शेवटीं ती तेथेंच मुलाला घट्ट धरून निजली. भूमातेच्या मांडीवर निजली. शरीरांतील ऊब जात चालली, प्रेम जात चाललें. मुलाला घट्ट धरून ठेवणारे ते तिचे हात आतां अलग झाले. मुलाकडे प्रेमानें पाहाणारे ते डोळे हळुहळू पूर्णपणें मिटले. कायमचे मिटले ! ती माता गतप्राण होऊन पडली. अरेरे !

तें मूल जागें झालें. मा मा मा मा करूं लागलें. आईचे हात पाहूं लागलें. त्या हातांनीं स्वतःला पुन्हा घट्ट धरून ठेवावें असें त्या मुलाला

वाटत होतें. परंतु ते हात दूर झाले होते. कायमचे दूर झाले होते. इतक्यांत त्या मुलाचें लक्ष समोरच्या झोपडींतून आलेल्या प्रकाशाकडे गेलें. तें मूल रांगूं लागलें. प्रकाशाकडे येऊं लागलें. झोपडीचें दार लावलेलें नव्हतें. त्या दारांतून तें मूल आंत आलें. तें चुलीजवळ आलें. गारठलेल्या त्या मुलाला ऊब मिळाली. मनूबाबा आपल्याच तंद्रींत होता. इतक्यांत त्याचें लक्ष त्या मुलाकडे गेलें. सोन्यासारखें मूल. तो पाहूं लागला. सोनें आलें असें त्याला वाटलें. त्यानें तें मूल एकदम उचललें. तें 'मा मा मा मा' करूं लागलें. बोलणारें सोनें, जिवंत सोनें त्याला मिळालें! तो त्या लहान मुलाला घेऊन नाचवूं लागला. त्यानें त्या लेकराला घट्ट धरून ठेवलें. जणुं पुन्हा कोणी घेऊन जाईल. तें मूल त्याच्याशीं खेळूं लागलें. तो त्या मुलाच्या केसांवरून प्रेमानें हात फिरवीत होता. ती मुलगी होती. सुंदर मुलगी. डोळे कसे टपोरे काळेभोर होते. डोक्यावर दाट काळेभोर केस होते. अंग कसें गोरें गोरें पान होतें. मातींतून, खड्यांतून ती मुलगी रांगत आली होती. मनूबाबानें तिचे पाय चेपले. "कोठून आलें माझें सोनें, सुंदर सोनें!" असें म्हणून तो त्या मुलीचे मुके घेऊं लागला. केव्हां एकदा उजाडतें असें त्याला झालें. साळूबाईला ही आनंदाची वार्ता केव्हां सांगूं असें त्याला झालें. शेवटीं ती मुलगी मनूबाबांच्या प्रेमळ हातांत झोपीं गेली. मनूबाबांनाहि झोप लागली.

बाहेर पाखरें किलबिल करीत होतीं. ती लहान मुलगी उठली. मा मा मा मा करूं लागली. ती दाराकडे निघाली. कोठें जातें ही मुलगी? तिची आई आहे कीं काय बाहेर? मनूबाबा बाहेर येऊन पाहूं लागला. तों त्याला दूर कांहीं तरी दिसलें. ती चिमणी मुलगी घेऊन तो तेथें गेला, तों तेथें एक अनाथ स्त्री मरून पडलेली दिसली. ती मुलगी खालीं उतरूं लागली. मनूबाबानें तिला खालीं ठेवलें. ती लहानगी आईजवळ गेली. आईचे हात ती ओढूं लागली. परंतु आज आईचे हात तिला प्रेमानें ओढून जवळ घेत नव्हते. ती दूध पिण्याची खटपट करूं लागली.

ती आईचे डोळे उघडूं लागली. 'मा मा मा मा!' बोबड्या शब्दांनीं ती मुलगी आईला जागवूं पाहात होती. ती आईला हांका मारीत होती. आई ना उठे, ना बोले; ना बसे ना हसे. ती लहान मुलगी रडूं लागली. आपल्या रडण्यानें तरी आई उठेल असें तिला वाटलें. परंतु आज आई कशानेंहि उठेना. कां झाली कठोर आई?

मनूबाबाचें हृदय कळवळलें. त्यानें त्या मुलीला उचलून घेतलें. तिनें त्याच्या गळयाला मिठी मारली. मनूबाबा तेथून निघाला. तो एकदम दिगंबररायांकडे आला. दिगंबररायांकडची मंडळी आतां कोठें उठत होती. कोणाचीं तोंडधुणीं होत होतीं. तोंच अंगणांत मनूबाबा त्या लहान मुलीला घेऊन उभा राहिला. सर्वांना आश्चर्य वाटलें.

"हें काय, मुलगी कोठून आणलीत? असें उजाडत कोठें आलेत? अशी काय तुमची चर्या? काय आहे हकीगत?" त्यांना विचारण्यांत आलें.

"एक अनाथ स्त्री रस्त्यांत मरून पडली आहे. ही तिची मुलगी. ही रांगत माझ्या झोपडींत आली. चला लवकर. डॉक्टर बोलवा. ती स्त्री जिवंत आहे कीं मेली तें पहा. दया करा त्या अनाथ स्त्रीवर, ह्या मुलीच्या आईवर." मनूबाबा सद्गदित होऊन म्हणाला.

दिगंबररायांच्या अंगणांत गर्दी जमली. शेजारीपाजारी जमले. संपतराय त्या चिमण्या मुलीकडे पाहात होता. ती मुलगी घ्यावी असें त्याला वाटलें.

"ती स्त्री जिवंत असेल का?" त्यानें घाबरत प्रश्न विचारला.

"जिवंतपणाचीं लक्षणें नाहींत. परंतु डॉक्टर बोलवा. प्रयत्न करून पाहा." मनूबाबा म्हणाला.

शेवटीं मंडळी निघाली. डॉक्टरांना बोलावणें गेलें. डॉक्टर अजून अंथरुणांतच होते. आतां कशाला उजाडत त्रास द्यायला आले, असें त्यांना वाटलें. बाहेर गारवा होता. त्यांना सुखनिद्रा, साखरझोप लागली होती. परंतु लोकांनीं हाकारे करून त्यांची झोप मोडली. डॉक्टर आदळ-आपट करीत आले. तों समोर संपतराय दिसले!

" तुम्हीहि आलां आहांत वाटतें ? एवढ्या थंडींत तुम्ही कशाला बाहेर पडलांत ? तुम्ही श्रीमंत माणसें, सुकुमार माणसें. थंडी बाधायची. मी जातोंच आतां. पाहातों कोण पडलें आहे." डॉक्टर म्हणाले.

" मीहि येतों." संपतराय म्हणाला.

" दयाळू आहांत तुम्ही. तुमचें हृदय थोर आहे. अनाथासाठीं कोण येणार धावत ?" साळूबाई तेथें येऊन म्हणाली.

त्या अनाथ स्त्रीजवळ सारा गांव जमला. डॉक्टरांनीं नाडी पाहिली. प्राण केव्हांच निघून गेले होते. अरेरे ! त्या लहान मुलीला सोडून माता गेली. मुलगी जगांत उघडी पडली.

" या मुलीचें आतां कोण ?" डॉक्टर म्हणाले.

" मी करीन. मनूबाबा, ती मुलगी मजजवळ द्या. आमच्या घरीं तोटा नाहीं. दाई ठेवीन. गडीमाणसें तिला खेळवतील, आंदुळतील, द्या ती मुलगी. कशी आहे सोन्यासारखी !" संपतराय म्हणाला.

" नाहीं. मी कोणाला देणार नाहीं. हें माझें सोनें आहे. हें माझ्याकडे आलें आहे. ह्या मुलीचें आतां सारें मी करीन. मी करीन."

असें म्हणून मनूबाबानें तिला घट्ट धरून ठेवलें. तिनेंहि विश्वासानें त्याच्या गळ्याला मिठी मारली. त्यानें तिचे मुके घेतले.

" मनूबाबा, तुमच्या घरांत दुसरें कोणी नाहीं. कसें कराल त्या मुलीचें ?" कोणीं विचारलें.

" दुसरें कोणी नाहीं म्हणूनच मला करतां येईल. सारें लक्ष तिच्याकडे देतां येईल. मला दुसरा व्याप नाहीं, दुसरे धंदे नाहींत. मी या मुलीची आई होईन. बाप होईन. मी तिचें सारें करीन." मनूबाबा म्हणाला.

" हे निदान दहा रुपये तरी घ्या. तिला गरम कपडे करा. अंथरुण-पांघरुण करा. कधीं लागलें तर मजजवळ मागा. मनूबाबा, तुम्ही

वस्त्रें विणलीं. नववधूसाठीं वस्त्रें विणलीं. त्याला भरपूर मजुरी मिळाली. लहानग्या मुलीसाठीं ती झाली.

लग्नाचा दिवस आला. मोठा सोहळा झाला. लग्न लागलें. वधूवरांनीं परस्परांस माळा घातल्या. बार वाजले, वाजंत्रीं वाजलीं, चौघडे वाजले. रात्रीं मोठी वरात निघाली. घोड्यावर बसून वधूवरें जात होतीं. चंद्रज्योति लाविल्या जात होत्या. मनूबाबा त्या लहान मुलीला वरात दाखविण्यासाठीं उभा होता. ती लहान मुलगी वरात बघत होती. घोड्याकडे बोट दाखवीत होती. संपतरायाचें लक्ष त्या मुलीकडे गेलें. त्याच्या डोळ्यांत पाणी आलें. आईवेगळी मुलगी. अरेरे !

गांवांत मोठी मेजवानी झाली. झाडून साऱ्या गांवाला लाडू मिळाले. परंतु मनूबाबा जेवायला गेला नाहीं. त्याच्या घरीं लाडू पाठविण्यांत आले. त्या लहान मुलीला सुंदर कपडे पाठविण्यांत आले. बाळलेणें पाठविण्यांत आलें. परंतु मनूबाबानें तें बाळलेणें मुलीच्या अंगावर घातलें नाहीं. त्यानें ते कपडे तिला चढविले नाहींत. तो म्हणाला, " मी माझ्या श्रमानें पैसे मिळवीन व बाळलेणें करीन. मी स्वतः सुंदर वस्त्रें विणीन व त्याचीं आंगडीं या मुलीला करीन. लोकांचीं कशाला ? "

वधूवरांस सर्व गांवानें दुवा दिला. वधूवरांचा नवीन संसार सुरू झाला. इंदुमती आतां आपल्या सासरीं राहायला आली. सासू नव्हतीच. तीच आतां घरधनीण होती. घरांत येतांच तिनें घराला कळा आणली. सारा वाडा तिनें स्वच्छ झाडायला लावला. कोळिष्टकें उडून गेलीं. वाडा आरशासारखा झाला. वरतीं दिवाणखाना होता. त्यांत मोठमोठ्या तसबिरी होत्या. त्यांच्यावर खंडीभर धूळ बसली होती. इंदुमतीनें स्वतः ती धूळ पुसून काढली. तसबिरी प्रसन्न दिसूं लागल्या. दिवाणखान्यांत स्वच्छ बैठक घालण्यांत आली. शुभ्र असे लोड तेथें ठेवण्यांत आले. फुलदाणींत फुलांचा गुच्छ तेथें ठेवण्यांत आला. दिवाणखान्याला तेज चढलें.

" किती आतां प्रसन्न वाटतें! पूर्वी या दिवाणखान्यांत येऊं नये असें वाटे." संपतराय म्हणाला.

" स्त्रियांच्या हातांत जादू आहे. स्त्रियांच्या हातांचा स्पर्श होतांच अमंगलाचें मंगल होतें. मरणाचें जीवन होतें. खरें ना?" इंदुमतीनें हसून विचारलें.

" होय. स्त्री म्हणजे सौंदर्यदेवता. स्त्री म्हणजे व्यवस्था. स्त्री म्हणजे नीटनेटकेपणा. स्त्रियांना घाणेरडें आवडत नाहीं. भांडीं स्वच्छ ठेवतील. घर स्वच्छ ठेवतील. कपडे स्वच्छ ठेवतील. स्त्रियांशिवाय स्वच्छता कोण ठेवणार? प्रसन्नता कोण निर्मिणार? स्त्रियांशिवाय संसार नीरस आहे. तुम्ही संसारांतील संगीत, संसारांतील माधुर्य. पुरुष अव्यवस्थित असतो. तुम्ही त्याच्या जीवनांत व्यवस्था आणतां. त्याला वारेमाप जाऊं देत नाहीं, आदळ-आपट करूं देत नाहीं. इंदु, खरोखरच तुझ्या हातांत जादू आहे. तुझा स्पर्श अमृताचा आहे." संपतराय प्रेमानें म्हणाला.

घरांत गडीमाणसें आतां वेळच्या वेळीं कामें करीत. पूर्वी त्यांना वाटेल तसें वागण्याचा ताम्रपट असे. परंतु आतां गड्यांना उजाडलें नाहीं तों अंगण झाडून ठेवावें लागे. कारण इंदुमती स्वतः सडा घालीत असे. सुंदर रांगोळी काढीत असे. " सूर्यनारायण दारांत उभे राहाणार. त्यांचें स्वागत नको का करायला? सारें स्वच्छ व पवित्र नको का?" असें ती म्हणे.

दिगंबररायांना सुनेचा आटोप पाहून समाधान वाटलें. ते आतां अशक्त झाले होते. आपण फार दिवस जगूं, असें त्यांना वाटत नव्हतें. एके दिवशीं संपत त्यांच्याजवळ बसला होता. त्याला ते म्हणाले, " संपत, मी आतां दोन दिवसांचा सोबती. या जगाचा आतां विसर पडूं दे. देवाकडे माझें चित्त लागूं दे. तुला शेवटचे दोन शब्द सांगतों. ध्यानांत धर. तुला शीलवती, गुणवती, रूपवती अशी पत्नी मिळाली आहे. रत्न मिळालें आहे. तें नीट सांभाळ.

तिला अनुरूप वाग. दोघांनीं सुखानें संसार करा. कोणाला दुखवूं नकोस. श्रीमंतीचा तोरा मिरवूं नकोस. होईल ती मदत करीत जा. सत्यानें राहा. न्यायानें राहा. आपणांला श्रीमंती आहे ती गर्व करण्यासाठीं नाहीं. दुसऱ्याच्या उपयोगीं पडावें म्हणून आहे. आपली संपत्ति म्हणजे गरीबांची ठेव. ती त्यांना वेळोवेळीं देत जा. व्यसनांत पडूं नको. आळशी राहूं नको. उद्योगांत राहावें, म्हणजे शरीर व मन निरोगी राहातें. समजलें ना. मला आतां कसलीहि इच्छा नाहीं. तुमचा दोघांचा जोडा पाहून डोळे कृतार्थ झाले. तो ठकसेन कोठें असेल देवाला माहीत. परंतु नको त्याची आठवण. जर कधीं काळीं आला, आधारासाठीं आला तर त्याला जवळ घे. कसाहि झाला तरी तो तुझा भाऊ. परंतु जपून वाग."

पित्याचे शब्द ऐकतां ऐकतां संपतचे डोळे भरून आले. इतक्यांत इंदुमती तिकडून आली. ती सासऱ्याचे पाय चेपीत बसली. सासऱ्यानें तिच्याकडे पाहिलें. तो म्हणाला, " इंदु, तुझ्या हातांत सारें आहे. हा संपत तुझ्या हातीं दिला आहे. त्याला सांभाळ. त्याच्या जीवनाला घाण लागूं देऊं नकोस. त्याचा दिवाणखाना स्वच्छ केलास. तेथें फुलांचे गुच्छ ठेवलेस. तेथील तसबिरी झाडल्यास. संपतच्या हृदयाचा दिवाणखानाहि निर्मळ ठेव. तेथें भक्ति, प्रेम, दया, पवित्रता यांचा सुगंध पसर. समजलीस ना. तूं थोर मनाची आहेस. आतां मला काळजी नाहीं. संपतची जीवननौका तूं नीट वल्हवून नेशील. सुखी राहा. एकमेकांची इच्छा सांभाळा. ओढून धरूं नका. आपलाच हेका चालवूं नका. एकमेकांविषयीं शंका कधीं घेऊं नका. संशय मनांत वाढूं देऊं नये. संशय मनांत येतांच तो निस्तरून घ्यावा. मोकळेपणा असावा. प्रेम हें मोकळें असतें. प्रेम भीत नाहीं. शंका आली, विचारावी. कधीं भांडण झालेंच तर पुन्हा विसरा. पुन्हा हसा. जो आधीं भांडण विसरून हसेल तो खरा. हसतेस काय इंदु ? तुला सारें समजतेंच आहे. पण मला राहावत नाहीं म्हणून सांगतों."

दिगंबररायांनीं पुत्राचे व सुनेचे हात आपल्या हातांत एकत्र घेतले. नंतर त्यांनीं त्यांच्या डोक्यांवर आपला मंगल हात ठेवून त्यांना आशीर्वाद दिला. संपत व इंदु—दोघांचे डोळे भरून आले होते. दोघांचे कां ? तिघांचे डोळे भरून आले. तिघांचीं हृदयें भरून आलीं आणि दिगंबररायांची घटकाहि भरत आली.

एके दिवशीं दिगंबरराय देवाकडे गेले. साऱ्या गांवाला वाईट वाटलें. अनेक स्नेही सखे, आप्त-इष्ट समाचारासाठीं आले. हळुहळु दुःख कमी झालें. संपतराय आतां धनी झाला. इंदुमती व तो दोघें सुखानें राहूं लागलीं. वडिलांप्रमाणें नीट कारभार चालवूं लागलीं.

★

प्रकरण सहावें

# सोनी

**मनूबाबाच्या** आयुष्यांत आतां क्रान्ति झाली. त्या लहान मुलीचें तो सारें करी. लहान मुलांचें कसें करावें तें त्याला माहीत नव्हतें. प्रेमानें मनुष्य सारें शिकतो आणि साळूबाई होतीच धडे द्यायला.

" मनूबाबा, तुम्हांला मुलीच्या अंगांत नीट आंगडें घालतां येईल का ? नाहींतर घालाल कसें तरी. तिच्या हातांची ओढाताण कराल. चिमुकले हात. का मी नीट घालून दाखवूं ?" साळूबाईनें विचारलें.

" दाखवा. एकदा दाखविलेंत म्हणजे पुरे. त्याप्रमाणें मी करीत जाईन. आणि वेणी कशी घालायची ? केंस सारखे डोळ्यांवर येतात. नाहींतर तिरळी व्हायची. मला दाखवा वेणी घालून." मनूबाबा म्हणाले.

" मी रोज येऊन वेणी घालीत जाईन." साळूबाई म्हणाली.

" नको. माझ्या हातांनीं मला सारें करूं द्या. मी करीन सारें. मी शिकेन. तसेंच हिला न्हायला कसें घालायचें तेंहि सांगा. केस स्वच्छ राहिले पाहिजेत. नाहींतर होतील उवा." मनूबाबा म्हणाले.

" मी दाखवीन एकदा न्हायला घालून. परंतु मनूबाबा, मुलीचें नांव काय ठेवायचें ? तिला कोणत्या नांवानें हांक मारायची ? चांगलेंसें नांव हवें. साधें व सुटसुटीत." साळूबाई म्हणाली.

" माझी एक लहान बहीण होती. तिची आठवणहि मी विसरून गेलों होतों. या मुलीला पाहून तिची मला आठवण झाली. ती बहीणच देवाघरून पुन्हा माझ्याकडे आली कीं काय असें वाटलें. त्या बहिणीचें नांव हिला ठेवावें असें मनांत येतें. परंतु तें नांव उच्चारायला कठीण होतें. तुम्ही सुचवतां का एखादें नांव ? " मनूबाबांनीं विचारलें.

" सोनी ठेवा नांव. तुमचें गेलेलें सोनें. तेंच जणुं लक्ष्मीपूजनाच्या दिवशीं परत आलें. सोनी नांव छान आहे. लहानसें, गोड नांव." साळूबाई म्हणाली.

" सोनी. खरेंच सुंदर नांव. कसें तुम्हांला सुचलें. माझें सोनेंच आहे तें. चालतें बोलतें सोनें." मनूबाबा म्हणाला.

मनूबाबा सोनीला पायांवर घेई. तिच्या अंगाला तेल लावी. हळद, दूध लावी. नंतर कढत पाण्यानें तिला आंघोळ घाली. तिचें आंग नीट पुशी. मग तिला तो झोपवी. तो गोड ओव्या म्हणे. सुंदर अभंग म्हणे. एके दिवशीं मनूबाबा सोनीला झोपवीत होते. अभंग म्हणत होते. इतक्यांत साळूबाई तेथें आली. झोपडीच्या दारांत उभी राहून ती ऐकत होती.

" तुम्हांला येतात वाटतें अभंग ? किती गोड म्हणतां ! " तिनें पुढें येऊन विचारलें.

" मी सारें विसरून गेलों होतों. परंतु ही सोनी आली व माझी सारी स्मृतिहि आली. लहानपणीं माझ्या बहिणीला मी ओव्या म्हणत असें. माझी बहीण लहान असतांना आईबाप मेले. माझ्या बहिणीला मींच वाढविलें. त्या वेळच्या ओव्या आतां आठवतात." मनूबाबा म्हणाला.

" निजली वाटतें ?" साळूबाईनें विचारलें.

" निजली. अलीकडे ती एकसारखी बाहेर जाते. आणली आंत तरी पुन्हा बाहेर जाते. मला भीति वाटते. तिला आतां पाय फुटले आहेत. नजर चुकवते व जाते बाहेर. गाई–गुरें जात असतात. शिंगेंसुद्धां मारायचीं. मघां जरा रागें भरलों तर लगेच रडायला लागली. मग मीं घट्ट पोटाशीं धरली तेव्हां थांबली. जरा बोललेलें तिला सहन होत नाहीं. " मनूबाबा सांगत होता.

" परंतु थोडा धाक दाखवायलाच हवा. मारूं-बिरूं नका. आमचा रामू लहान होता, तेव्हां असाच त्रास देई. एके दिवशीं त्याला घरांतील कोळसे ठेवावयाच्या खोलींत नेलें व म्हटलें, 'ठेवूं कोळशाच्या खोलींत ? येतील उंदीर, मग चावतील. ठेवूं कोळशाच्या खोलींत ? नाहीं न जाणार बाहेर ? बाहेर गेलास तर या कोळशाच्या खोलींत ठेवीन.

त्या दिवसापासून रामू बाहेर जाईनासा झाला. कांहीं तरी असें करावें लागतें." साळूबाई अनुभव सांगत होती.

मनूबाबा मागावर बसले होते. सोनी जवळच खेळत होती. सुताच्या गुंड्यांशीं खेळत होती, परंतु तिकडे रस्त्यावरून एक बैलगाडी जात होती. सोनीनें बैल पाहिले. ती दाराकडे वळली. ती घरांतून बाहेर पडली. ती लांब गेली. मनूबाबांच्या एकदम लक्षांत आलें. सोनी कोठें आहे? ते इकडे तिकडे पाहूं लागले. ते घाबरले. त्यांनीं झोपडीच्या सभोंवतीं पाहिलें. त्यांचा जीव घाबरला. छाती धडधडूं लागली. कोठें गेली सोनी? 'सोने, सोने!'—ते हाका मारूं लागले. सोनी ओ देईना, नाचत पुढें येईना. त्यांना झोपडीच्या उत्तर बाजूला असलेला तो खळगा आठवला. त्या खळग्याकडे तर नाहीं ना गेली? पडली तर नसेल तेथील चिखलांत? ज्या दिवशीं मनूबाबांचें सोनें चोरीस गेलें होतें, त्या रात्रींच्या पावसांत तो खळगा कोसळला होता. तो खळगा त्या दिवशीं बराच भरून गेला होता. गांवांतील पावसाचें सारें पाणी तेथें जाई. तेथें दलदल असे. मनूबाबांचें मन दचकलें. ते धांवपळ करीत होते. इतक्यांत त्यांना सोनी दूर दिसली.

"सोने, सोने!" म्हाताऱ्यानें हाक मारली.

सोनीचें लक्ष नव्हतें. ती रानफुलें गोळा करीत होती. पिवळीं जांभळीं फुलें.

"सोने, सोने!" असें म्हणून मनूबाबानें तिला एकदम उचलून घेतलें. त्यानें तिचे पटापट मुके घेतले. तिचे गोरे गोरे गाल लाल झाले होते. सोनी मनूबाबाच्या कानांत फुलें ठेवीत होती. सोनीला घेऊन तेथें तो म्हातारा उभा होता. त्या जागेकडे पाहात होता. ती पवित्र जागा होती. येथेंच सोनीच्या आईनें शेवटचें अनंत शयन केलें होतें. येथेंच भूमातेच्या मांडीवर सोनीच्या आईनें आपलें डोकें ठेवलें होतें. येथेंच 'मा मा मा मा' करीत लहानगी सोनी आईला उठवीत होती. आईनें

प्यायला द्यावें म्हणून रडत होती. आज सोनी तेथेंच येऊन बसली. तेथेंच रमली. त्या जागेवरचीं फुलें गोळा करीत राहिली. त्या मातेचा का आत्मा तेथें होता? त्या मातेच्या डोळ्यांतील अश्रूंचीं का तीं फुलें होतीं!

मनूबाबाच्या मनांत किती तरी विचार आले. त्यानें तीं फुलें सोनीच्या केसांत घातलीं. जणुं वनदेवतेची मुलगी अशी सोनी दिसूं लागली. त्यानें तिच्याकडे प्रेमानें पाहिलें. तिला उचलून घेतलें. तो सोनीला घेऊन घरीं आला.

"सोने, बाहेर गेलीस तर बघ. त्या कोळशाच्या खोलींत कोंडून ठेवीन. ठेवूं कोंडून? ठेवूं?" असें म्हणून त्यानें त्या लहान मुलीला त्या कोळशाच्या बळदांत थोडा वेळ ठेवलें. ती रडूं लागली. त्याला दया आली. त्यानें तिला जवळ घेतलें. तिचे डोळे त्यानें पुसले. तिच्या पायांना काळें लागलें होतें तें त्यानें धुतलें. "नाहीं हो, माझी बाळ ती. नाहीं हो ठेवायची कोळशांत. माझी सोनुकली ती." असें म्हणून त्यानें तिचे मुके घेतले.

सोनीला खेळण्यांचा तोटा नव्हता. वाटेल ती वस्तु तिला चाले. मनूबाबांची कात्री— त्या कात्रीवर तिचें फार लक्ष असे. एके दिवशीं तिनें ती कात्री पळविली. सुताच्या गुंड्यांचे ती तुकडे करीत होती. सोनी कशाशीं खेळत आहे हें पाहण्यासाठीं मनूबाबा गेले, तों सोनी सुताचे धागे तोडीत आहे असें त्यांना दिसलें.

"तुला कात्री घेऊं नको सांगितलें तरी पुन्हा घेतलीस? हात कापेल ना! त्या कोळशाच्या बळदांत ठेवूं?" त्यानें विचारलें.

"हं ठेवा बाबा. त्या कोळशांच्या खोलींत मला ठेवा. मग तुम्हांला मी हाका मारीन. तुम्ही मला घ्याल. माझे काळे पाय धुवाल. ठेवा ना त्या खोलींत." ती सोनुकली म्हणाली.

मनूबाबाला हसूं आलें. ज्या वस्तूची दहशत तो दाखवूं पाहात होता, तीच वस्तु सोनीला गमतीची वाटत होती. सोनीला खोटी भीति घालायची नाहीं असें त्यानें ठरविलें. मोकळेपणानें सोनी वाढूं दे.

त्यानें सोनीसाठीं मुद्दाम सुंदर कापड विणलें. त्याचे कपडे तिच्यासाठीं करण्यांत आले. किती सुंदर दिसे सोनी त्या कपड्यांत. सोनीसाठीं तो चांगली भाजी करी. तिच्यासाठीं दूध घेई. सोनीच्या भातावर तूप वाढी. तिच्या पोळीला तूप लावी. मनूबाबाचे पैसे आतां शिल्लक पडत नसत. पूर्वीं पैसे भराभर सांठत. मोहरा जमत. परंतु आतां ? पूर्वीं पैशांना हेतु नव्हता. ते निर्हेतुक पैसे भराभर जमत असत. परंतु आतां पैशांचा उपयोग होऊं लागला. पूर्वीं पैशासाठीं पैसे होते. आतां सोनीसाठीं ते हवे होते.

सोनी चंद्राच्या कोरेप्रमाणें वाढत होती. मनूबाबा तिला घेऊन बसे. तो तिला गोष्टी सांगे. कधीं कधीं तो तिच्याबरोबर खेळे. तो तिला धरी, ती त्याला धरी. मनूबाबाची पूर्वींची निराशा गेली. पूर्वीं त्याच्या जीवनांत अर्थ नसे. यंत्राप्रमाणें तो काम करी. कापड विणी. पैसे सांठवी. ते पैसेच कुरवाळी, तेच हृदयाशीं धरी. परंतु आतां त्याच्या जीवनांत प्रकाश आला. प्रेम, स्नेह, दया, माणुसकी, कर्तव्य, आनंद यांचे बंद झरे पुन्हा वाहूं लागले. जीवनाला आतां अर्थ प्राप्त झाला. जीवनांत गोडी आली. पूर्वीं मनूबाबाचे डोळे कसे तरी भयाण दिसत. शून्य दिसत. परंतु आतां तेच डोळे प्रेमळ दिसूं लागले. पूर्वीं त्याच्या तोंडावर कोणतीच भावना नसे. परंतु आतां तें तोंड सात्त्विकतेनें फुललें होतें. पंधरा वर्षांत मनूबाबा हसला नाहीं. परंतु आतां सोनीशी तो हसे खेळे. मनूबाबा पुन्हा मनुष्य झाला. पूर्वीचें पाषाणमय जीवन संपलें. मनूबाबाचा जणुं पुनर्जन्म झाला. लहानशी सोनी. परंतु तिनें ही क्रान्ति केली होती. तिचा हात अद्याप धरावा लागत होता. तिला नीट बोलतां येत नव्हतें. परंतु म्हाताऱ्या मनूबाबाला न कळत ती आधार देत होती. त्याचें जीवन ती फुलवीत होती. त्याच्या जीवनांत ती रस ओतीत होती. आनंद ओतीत होती. जगांत असे चमत्कार होतात. एखाद्या लहान मुलाचा चिमणा हात माणसाचा उद्धार करूं शकतो, माणसाला विनाशापासून वांचवूं शकतो.

सोनी आतां बरीच मोठी झाली. ती पुष्कळदा साळूबाईकडे जाई. तिच्याकडे खेळे. कधीं ती भातुकली करी. रामू तिचा खेळ मांडून देई. परंतु एखादे वेळेस तो भातुकलीचें सारें मटकावून टाकी. मग सोनी संतापे. ती सारा खेळ फेकून देई. बुडकुलीं भिरकावी. मग रामू पुन्हा तिचा खेळ मांडी, तिची समजूत घाली.

"रामू, कां रे तिला रडवतोस?" साळूबाई रागानें विचारी.

"तिला मागून हसविण्यासाठीं." तो लबाड उत्तर देई.

"असें भांडूं नये. ती लहान आहे." साळूबाई म्हणाली.

"मी वाटतें मोठा आहें?" तो विचारी.

"मला फुलें देशील आणून, रामू? फुलें आणून देणार असलास तर मी हसेन. नाहींतर आतां रागावून निघून जाईन." सोनी म्हणे.

"बरें आणीन फुलें. आतां हस." तो म्हणे.

मग सोनी हसे व रामूचे डोळे धरी. अशी गंमत चाले. कधीं कधीं सोनी साळूबाईकडे जेवे. मग मनूबाबा घरीं रागावत.

"रामू वाटतें लोक आहे? रामू आपलाच. रामूची आई आपलीच. त्यांच्याकडे जेवल्यें म्हणून काय झालें हो बाबा? तुम्ही रागावलेत? नको जाऊं?" ती विचारी.

"एखादे वेळेस जावें." तो म्हणे.

"मग मी का रोज जातें?" ती विचारी.

असे दिवस जात होते. मनूबाबा आतां सोनीला लिहावाचायला शिकवूं लागले. एके दिवशीं सोनीसाठीं त्यांनीं लहानसें पुस्तक आणलें. ते तिच्याबरोबर वाचीत होते. तों साळूबाई आली.

"मनूबाबा, तुम्हांला वाचतां येतें वाटतें?" तिनें आश्चर्यानें विचारलें.

"मध्यंतरीं विसरलों होतों. पंधरा-वीस वर्षांत कधीं लिहिलें नाहीं, कधीं वाचलें नाहीं. परंतु आतां सारें आठवतें. माझी विद्या परत आली. लिहिणें वाचणें परत आलें. सोनीला शिकवितां यावें म्हणून माझें शिकणें मला परत मिळालें. खरें ना सोने? आम्हांला लहानपणीं शिकवतांना

मारीत. परंतु सोनीला नाहीं हो मी मारीत. सोनी शहाणी आहे. भराभर येतें तिला." मनूबाबा सांगूं लागले.

"रामूसुद्धां चांगलें वाचतो. बाकी गरिबांना फार शिकून काय करायचें म्हणा. परंतु लिहितां वाचतां आलें पाहिजे. म्हणजे पत्र लिहितां येतें, आलेलें वाचतां येतें. हिशेब करतां येतो. नाहींतर गरिबांना फसवतात. मला नाहीं वाचतां येत. रामू माझ्या पाठीस लागतो. परंतु मी त्याला म्हणतें, 'मला नको रे आतां शिकवूं.' तुझी बायको आली म्हणजे पुढें तिला तूं शिकव." साळूबाई हसून म्हणाली.

"रामूची बायको ! अय्या !" सोनी आश्चर्यानें ओठावर बोट ठेवून हसून म्हणाली.

एके दिवशीं सोनी बाहेर गेली होती. संपतरायांच्या वाड्यावरून जात होती. संपतरायांनीं तिच्याकडे पाहिलें. सोनीला हाक मारावी असें त्यांना वाटलें. परंतु इतक्यांत त्यांची पत्नी इंदुमती त्यांच्याजवळ आली.

"काय बघतां ?" तिनें प्रेमानें विचारलें.

"त्या विणकराची मुलगी." तो म्हणाला.

"बाकी त्या मनूबाबाची कमाल आहे हो. त्या पोरीचें तो सारें करतो. एवढीशी होती. तेव्हांपासून त्यानें ती वाढविली. तिचें हगमूत काढलें. आजारीपणांत जपलें. तिला भरवी, तिला खेळवी. तिच्याबरोबर नाचे, हसे. तिला लिहावाचायलासुद्धां शिकवितो. बायकासुद्धां इतकें करायला कंटाळतील. आयासुद्धां कंटाळतील. परंतु मनूबाबा सारें आनंदानें करतात आणि मुलगीहि आहे सुंदर. बघा कशी दिसते. ती काय पाहाते आहे ?"

"ती आपल्या बागेंतील फुलांकडे बघत आहे."

"केसांत घालायला हवीं असतील."

"चल, तिला आपण देऊं फुलें."

"थांबा, मी गड्याला सांगतें."

परंतु इतक्यांत सोनी तेथून पळाली. संपतरायांचा कोणीतरी नोकर तिच्यावर ओरडला. ती घाबरली. धापा टाकीत ती घरीं आली. मनूबाबा स्वयंपाक करीत होते. सोनी रडत होती.

" काय झालें बेटा ? " त्यानें प्रेमानें विचारलें.

सोनी बोलेना. तो तिच्याजवळ आला. त्यानें तिच्या केसांवरून हात फिरविला. तिच्या पाठीवरून हात फिरविला. सोनीचें रडें थांबलें.

" कां रडत होतीस ? " त्यानें पुन्हा प्रश्न केला.

" बाबा, आपल्या घराजवळ एखादी बाग करा ना. लहानशी फुलांची बाग. मात्र त्या बागेंत तुम्हीं नाहीं काम करायचें. मी व रामू त्या बागेंत खपूं. आम्ही खणूं, फुलझाडें लावूं, पाणी घालूं. रामूनें कबूल केलें आहे. कराल का बाग ? लहानशी असली तरी पुरे. परंतु कोठें करायची ? आपली अशी जागाच नाहीं. किती तरी जमीन पडली आहे पलीकडे. त्या खळग्याजवळ. आपणाला ती घेतां नाहीं येणार का ? येईल का घेतां ? त्यासाठीं का बरेच पैसे पडतील ?" सोनीनें मनूबाबाच्या गळ्याला मिठी मारून विचारलें.

" घेऊं हो जागा. करूं हो बाग. मग सोनीच्या केसांत रोज फुलें. रोज गजरे." मनूबाबा हसून म्हणाला.

"रामूच्या आईच्या देवांनाही होतील आणि मी गुच्छ करून तुम्ही विणतां तेथील खिडकींत ठेवीन. तुम्हांला विणतांना छान वास येईल. नाहीं ? पण बाबा, एक अट आहे. तुम्हीं नाहीं हो बागेंत काम करायचें. तुम्ही दमाल. तुम्ही आम्हांला सांगा बाग कशी करायची तें. रामू व मी दोघेंजणें काम करूं." ती म्हणाली.

" काम करतां करतां भांडूं लागाल." तो हसून म्हणाला.

" आतां का आम्ही लहान आहों भांडायला ?" तिनें हसून विचारलें.

" मग तूं का मोठी झालीस ? अहा रे मोठी सोनी." मनूबाबा म्हणाले.

" खरंच बाबा. मी कांहीं लहान नाहीं. आतां मी मोठी झालें बाबा." ती म्हणाली.



" तूं माझ्याजवळ लग्न लावशील ? आपण पतिपत्नी होऊं. दोघें संसार करूं. "

[ पृष्ठ ४७

आणि खरेंच सोनी आतां मोठी होत चालली होती व रामूही मोठा होत चालला होता. एके दिवशीं रामू व सोनी दोघेंजणें बसलीं होतीं.

" सोन्ये, तुला मी एक विचारूं ?" त्यानें गंभीरपणें प्रश्न केला.

" विचार ना. माझी परवानगी कशाला ?"

" तूं रागावशील."

" आतां का मी लहान आहें ? भातुकली खेळत असें तेव्हां रागावत असें. तेव्हां मी लहान होतें."

" आतां तूं मोठी झालीस."

" आणि तूंसुद्धां मोठा झालास."

" म्हणूनच तुला मी कांहींतरी विचारणार आहें."

" जें विचारणार आहेस तें का मोठें झाल्यावरच विचारायचें असतें ?"

" हो."

" मग विचार."

" तूं माझ्याजवळ लग्न लावशील ? आपण पतिपत्नी होऊं. दोघें संसार करूं."

" परंतु मग माझ्या बाबांना कोण ? ते म्हातारे झाले आहेत. त्यांना मी कसें सोडूं ? त्यांनीं मला लहानाचें मोठें केलें. ते का म्हातारपणीं एकटे राहाणार ? हल्लीं त्यांच्यानें काम होत नाहीं. त्यांना सोडून जाणें म्हणजे कृतघ्नपणा आहे."

" परंतु त्यांना नको सोडून द्यायला. आपण सारीं एकत्र राहूं. मनूबाबांना विश्रांति देऊं."

" असें चालेल का ?"

" न चालायला काय झालें ? परंतु मी तुला आवडत असेन तर."

" तूं नाहीं आवडत तर कोण ? तुझ्याशिवाय मला करमत नाहीं. तूं चांगला आहेस. खरेंच मला तूं आवडतोस."

" आणि मला तूं आवडतेस."

" मी बाबांना विचारीन. ते काय म्हणतात पाहूं."

" विचार. त्यांचा आनंद तोच आपला."

रामू व सोनी निघून गेलीं. रामू कामाला गेला. सोनी घरीं आली. त्या दिवशीं सायंकाळीं मनूबाबा सोनीचा हात धरून फिरायला गेले होते. सूर्य अस्तास जात होता. पश्चिमेकडे किती सुंदर रंग पसरले होते आणि सोनीच्या तोंडावरही शतरंग नाचत होते.

" सोन्ये, किती सुंदर दिसत आहे तुझें तोंड !" मनूबाबा म्हणाले.

" तुम्हांला मी नेहमींच सुंदर दिसतें." ती म्हणाली.

" मलाच नाहीं. सर्वांनाच तूं सुंदर दिसतेस. परंतु तुझें हें सौंदर्य कोणाच्या पदरीं घालायचें ? सोन्ये, तूं आतां मोठी झालीस. तुझें लग्न केलें पाहिजे. मी आतां म्हातारा झालों. तुझे हात योग्य अशा तरुणाच्या हातीं दिले म्हणजे माझें कर्तव्य संपलें."

" बाबा !"

" काय सोन्ये !"

" तुम्हांला एक विचारूं ?"

" विचार बेटा."

" रामू मला विचारीत होता."

" काय विचारीत होता ?"

" तूं माझी बायको होशील का म्हणून."

" तूं काय म्हणालीस ?"

" म्हटलें, कीं बाबांना विचारीन."

" तुम्हीं दोघांनीं ठरवून टाकलेंत एकंदरींत. माझी चिंता कमी केलीत."

" बाबा, रामू चांगला आहे. तुम्हांला नाहीं तो आवडत ?"

" साऱ्या जगाला तो आवडतो. दिसतो कसा दिलदार. आळस त्याला माहीत नाहीं. खरेंच चांगला आहे रामू."

मनूबाबांचे डोळे ओले झाले. त्यांनीं सोनीचा हात हातांत घेतला. त्या हातावर त्या प्रेमळ डोळ्यांतील पाणी पडलें. त्या अश्रूंत किती तरी अर्थ भरलेला होता !

" सोन्ये, आज मला सारें आठवतें आहे. सारें माझें व तुझें आयुष्य माझ्या डोळ्यांसमोर येत आहे. या रायगांवांत मी एकटा होतों. कधीं हसलों नाहीं, कधीं कोणाजवळ बोललों नाहीं. मी शुष्क होतों. सारें जीवन जणुं पाषाणमय होतें. मी दिवसभर विणीत बसें. पैसे मिळत ते सांठवीत असें. मोहरांच्या दोन पिशव्या भरल्या. त्या मोहरा म्हणजे माझें जीवन. परंतु त्या मोहरा चोरीस गेल्या आणि तूं मला मिळालीस. एके दिवशीं पहाटे तूं माझ्या झोपडींत आलीस. तुझी आई झोपडी-पासून कांहीं अंतरावर मरून पडली होती. तुला मीं माझी मानली. तुला वाढवलें. माझ्या जीवनांत तूं आनंद आणलास. पंधरा वर्षें माझी वाचा बंद होती. जीवनाचे सारे झरे बंद होते. परंतु मी हसूं खेळूं लागलों. तूं माझें जीवन कृतार्थ केलेंस. कशासाठीं जगावें तें मला कळूं लागलें. सोन्ये, तुझ्यामुळें माझ्या जीवनांत केवढी क्रान्ति झाली, ती तुला माहीत नाहीं. तूं माझा उद्धार केलास. तुझे बोबडे बोल, तुझें हसणें, तुझें रडणें, यांनीं माझें वाळलेलें जीवन पुन्हा फुललें. आतां तूं मोठी झालीस. तुझ्या डोळ्यांसमोर नवीन क्षितिजें आतां दिसत असतील. संसाराचीं नवीन स्वप्नें दिसत असतील. सोन्ये, जा. योग्य अशा तरुणासह संसार करायला जा. मी पुन्हा एकटा राहीन. पूर्वीं एकटा होतों, पुन्हा एकटा माझा प्राण व मी. माझ्यासाठीं तुझा कोंडमारा नको, सोन्ये."

म्हाताऱ्याला बोलवेना. घळघळ अश्रु पुन्हा वाहूं लागले.

" बाबा, नका रडूं. तुमचें माझ्यावर किती प्रेम. तळहातींच्या फोडाप्रमाणें तुम्हीं मला वाढवलेंत. मला कोण होतें जगांत ? या लहानशा मुलीचे तुम्ही आईबाप झालेत. आतां तुमच्या हातांनींच

योग्य पति द्या. रामू चांगला आहे. आणि बाबा, तुम्हांला कांहीं सोडून नाहीं मी जाणार. आपण सारीं एकत्र राहूं. रामू व मी काम करूं. तुम्हीं विश्रांति घ्यायची. तुमचा आशीर्वाद आम्हांला मिळायचा. खरें ना बाबा ? तुम्हांला सोडून मी कशी जाईन ? आपण एकत्र राहूं."

"राहूं. एकत्र राहूं."

सोनीनें मनूबाबांचा हात धरला. दोघें घरीं आलीं. आज त्या दोघांचें हृदय भरून आलें होतें.

★

प्रकरण सातवें

# सत्य लपत नाहीं

"बाबा, बागेसाठीं घेणार ना जागा? कधीं घेणार?" सोनीनें विचारलें.

"घेणार आहें. हल्लीं त्याच खटपटींत आहें." मनूबाबा म्हणाले.

आणि मनूबाबा खरोखरच त्या उद्योगांत होते. झोपडीच्या जवळच ते जागा बघत होते. ज्या ठिकाणीं सोनीची अनाथ माता मरून पडली होती, तें ठिकाण बागेच्या मध्यभागीं असावें अशी एक सुंदर उदार कल्पना त्या विणकराच्या मनांत आली. ती साडेतीन हात जागा बागेच्या मध्यभागीं पवित्र राखूं. भोवतीं फुलांचे ताटवे लावूं. जणुं सोनीच्या आईची समाधीच! असे विचार मनूबाबाच्या मनांत खेळत होते.

मनूबाबानें ती जमीन खरेदी केली. पडितच जमीन होती. फार किंमत पडली नाहीं आणि संपतरायानें ती जमीन कमी किंमतींत त्या म्हाताऱ्याला मिळावी म्हणून योजना केली. संपतरायाचें सोनीवर प्रेम होतें. मधूनमधून तो मनूबाबांकडे पैशाच्या रूपानें मदत पाठवीत असे.

मनूबाबांनीं जी जमीन खरेदी घेतली, तिच्याभोवतीं दगडांचें सुंदर कुसूं घालून देण्याचें संपतरायानें ठरविलें. त्या जमिनीजवळच दगडांची खाण होती. तो जो खळगा होता, तेथेंच ती खाण होती. मजूर तेथें कामाला लागले. दगड खणून काढूं लागले. तसेंच तेथें जी दलदल होती, तीहि भरून काढण्याचें काम सुरू झालें. मनूबाबाच्या बागेजवळ चिखल नको. गांवाचें गटार नको.

संपतरायाचीं माणसें काम करीत होतीं. परंतु तेथें काम करणारे एकदम चकित झाले. खणतां खणतां तेथें एकदम कांहीं तरी सांपडलें. काय सांपडलें? त्या दोन चामड्याच्या पिशव्या सांपडल्या. मोहरांनीं भरलेल्या पिशव्या! आणि तेथें तो सोनेरी मुठीचा संपतरायांचा चाबूक

सांपडला. तेथें एक मनुष्य पुरलेला असावा. त्याचीं हाडें होतीं. कोण तो मनुष्य ? परंतु तेथें एक आंगठीहि होती. त्या आंगठीवर ठकसेनाचें नांव होतें ! ठकसेन ! संपतरायाचा भाऊ ठकसेन ! तो का चोर होता ? त्यानें का मनूबाबांच्या पिशव्या चोरल्या ? आश्चर्य ! पंधरा वर्षांनीं गोष्ट उघडकीस आली.

गांवांतील सारी मंडळी त्या खळग्याकडे धावत आली. लहान-मोठीं सारीं माणसें तेथें जमलीं. मनूबाबा, सोनी, रामू, साळूबाई सारीं तेथें आलीं.

" माझें सोनें. माझें कष्टानें मिळविलेलें सोनें. परंतु सोनीपुढें हें सोनें फिकें आहे. सोनीच्या लग्नासाठीं सोनें आलें." मनूबाबा म्हणाले.

" परंतु येथें कसा दिगंबररायांचा मुलगा पडला ?"

" त्या दिवशीं गारांचा पाऊस होता. गारांच्या मारानें ठेचला गेला असेल. काळोखांत हा खळगा दिसला नसेल. पडला असेल खळग्यांत. वरून गारांचा मारा आणि खालीं दगडांवर आपटला असेल. हा खळगा त्याच रात्रीं कोसळला. दगड-माती अंगावर पडून ठकसेन पुरला गेला. गांवांतील सारा गाळहि पाण्याबरोबर आला असेल व तोही आणखी अंगावर सांचला असेल. सृष्टीनें ठकसेनाला मूठमाती दिली."

" आणि हा चाबूक ?"

" त्या दिवशीं तो घोडी विकायला गेला होता. घोडी तिकडे मरून पडली. मग पैशांसाठीं इकडे येऊन त्यानें चोरी केली असेल. त्या वेळेस चाबूक हातांत असेल. परंतु देवाच्या मनांत निराळेंच होतें."

" एवढ्या मोठ्या घराण्यांत असा कसा निपजला ?"

" जगांत असे अनेक प्रकार होतात."

" मनूबाबाचे पैसे मिळाले. चांगलें झालें. म्हातारपणीं आतां काम करण्याची दगदग नको. मनूबाबांना त्यांच्या प्रामाणिकपणाचें, प्रेमाचें, उदारपणाचें देवानें बक्षीस दिलें." लोक म्हणाले.

इतक्यांत संपतराय तेथें आले. सारे लोक बाजूला झाले. त्यांनीं तो मृत आकार पाहिला! इतर सर्व वस्तु पाहिल्या. ते गंभीरपणें उभे राहिले.

"माझाच भाऊ. देव त्याला क्षमा करो. मनूबाबा, तुम्हीहि क्षमा करा." संपतराय दुःखानें म्हणाले.

संपतरायांनीं त्या अवशेषांस अग्नि दिला. सारे लोक परतले. संपतरायहि घरीं आले. गांवांत चाललेली गडबड इंदुमतीच्या कानीं आली. परंतु सारा वृत्तान्त तिला नीट कळला नव्हता. संपतराय आले व आपल्या खोलींत खिन्नपणें बसून राहिले.

"काय आहे गडबड, काय आहे हकीगत? तुमचा चेहेरा असा कां काळवंडला? सांगा ना सारें." इंदुमतीनें आस्थेनें विचारलें.

"काय सांगूं? त्या विणकराचें सोनें पंधरा वर्षांपूर्वी चोरीस गेलें होतें, तें माझ्या भावानें चोरलें होतें. पंधरा वर्षांनीं सत्य उघडकीस आलें. तुझ्या पतीचा भाऊ चोर निघाला. चोराच्या भावाशीं तूं लग्न लावलेंस. माझ्यामुळें, आमच्यामुळें तुला कमीपणा. तुझें माहेर मोठें, घरंदाज. थोर कुळांतील तूं. माझ्याकडे आतां तूं आदरानें पाहूं शकणार नाहींस. चोराचा भाऊ असें तुझ्या मनांत येईल. काय करणार मी?" असें म्हणून संपतराय केविलवाण्या दृष्टीनें पलीकडे पाहूं लागले. थोडा वेळ कोणी कांहीं बोललें नाहीं.

नंतर इंदुमती पतीचा हात प्रेमानें आपल्या दोन्हीं हातांनीं धरून म्हणाली, "तुम्ही वाईट नका वाटून घेऊं. तुमचा भाऊ असा निघाला त्यांत तुमचा काय दोष? घराण्याला थोडा कमीपणा येतो. परंतु काय करायचें? मामंजी आज हयात नाहींत हें एका दृष्टीनें बरें. नाहीं तर त्यांच्या जिवाला फार लागली असती ही गोष्ट. मी तुमच्याकडे भक्तिप्रेमानेंच पाहीन. मला जगाशीं काय करावयाचें आहे? माझें सारें धन म्हणजे तुम्ही. तुम्ही माझें सर्वस्व. तुम्ही निर्मळ व निष्पाप असलेत

म्हणजे झालें. तुम्ही निष्कलंक असलेत म्हणजे झालें. कां ? अशी कां करतां मुद्रा ? काय होतें तुम्हांला ? कां आले डोळे भरून ? नका हो रडूं. मनाला इतकें लावून नये घेऊं. बाकी भावाला असा अपघाती मृत्यु यावा याचें वाईट वाटणारच. परंतु आपला काय इलाज ?"

थोडा वेळ कोणी बोललें नाहीं.

संपतराय गंभीरपणें म्हणाले, "इंदु, आणखीहि तुला कांहीं सांगणार आहें. सत्य जगांत केव्हां ना केव्हां प्रकट होतेंच. मग सारें तुला सांगून टाकतों. सांगूं ?"

"सांगा. काय सांगायचें ?" ती भीतभीत विचारती झाली.

"इंदु, तुझा पतिहि निर्दोष नाहीं. हा संपतराय निष्पाप नाहीं. मी तुझ्याबरोबर लग्न करणें लांबणीवर टाकीत होतों. ही गोष्ट तुला आठवत असेल. मी एका मुलीच्या प्रेमपाशांत अडकलों होतों. तिच्याजवळ मी गुप्तपणें लग्न लावलें होतें. एका गांवीं एक घर भाड्यानें घेऊन तेथें तिला ठेविली होती. ती मुलगी गरीब घराण्यांतील होती. आम्ही मोठ्या घराण्यांतील. बाबांनीं त्या मुलीजवळ लग्न लावायला कधींहि संमति दिली नसती. मलाहि उघडपणें त्या मुलीला माझी पत्नी म्हणून येथें आणण्याचें धाष्टर्य झालें नाहीं. समाजाच्या टीकेला मी भ्यायलों. खोटे श्रेष्ठकनिष्ठपणाचे भेद, त्यांना मी बळी पडलों. मनानें मोठा तो मोठा. तो कोठें का जन्मेना. कोठें रानांतहि गुलाब फुलला, तरी त्याचा सुगंध दशदिशांना धावणारच. परंतु मी भ्याड होतों. त्या माझ्या पत्नीला माझ्यापासून एक सुंदर मुलगी झाली होती. मी मधून मधून तिच्याकडे जात असें. त्या सुंदर लहान अर्भकाला जवळ घे[illegible] असें. माझी पत्नी मला नेहमीं विचारी, 'कधीं नेणार घरीं ?' मी म्हणे 'नेईन लवकरच.' परंतु ती निराश झाली. लहान मूल कडेवर घेऊ[illegible] ती माझ्याकडे येण्यासाठीं निघाली असावी. पायीं यायला निघाल[illegible] तुला आठवते का ती गोष्ट ? पंधरा वर्षांपूर्वीची गोष्ट. मनूबाबां[illegible]

झोपडीजवळ एक अनाथ स्त्री मेलेली आढळली. इंदु, तीच माझी पहिली पत्नी आणि मनूबाबाकडे वाढणारी सोनी तीच माझी मुलगी. ती माझी पत्नी गांवाच्या सीमेवर विष पिऊन मरून पडली. पतीची बेअब्रू करण्यापेक्षां जगांतून गेलेलें काय वाईट ? माझ्यामुळें पतीच्या नांवाला कमीपणा का येईल ? तर मग मी या जगांत कशाला राहूं ? अशा विचारानें का तिनें मरण पत्करलें ? आणि ती मुलगी ! त्या विणकराला मीं म्हटलें, कीं मी त्या अनाथ मुलीला वाढवीन. परंतु तो देईना. ही माझी मुलगी आहे व ही मरून पडलेली अनाथ स्त्री माझी पत्नी आहे असें सर्व लोकांसमोर कबूल करण्याचें धैर्य मला झालें नाहीं. इंदु, असा मी आहें. तुझ्यापासून पंधरा वर्षें सत्य लपवून ठेवलें. परंतु आज सांगत आहें. या पापी पतीला क्षमा कर. तुझ्या प्रेमांत आहे का इतकी शक्ति ? इंदु !" असें म्हणून पतीनें आपलें डोकें वाकविलें.

इंदु थरथरत होती. ती हकीगत ऐकतांना क्षणोक्षणीं तिची मुद्रा बदलत होती. परंतु शेवटीं तिच्या डोळ्यांतून करुणा चमकली. तिनें पतीच्या मस्तकावरून हात फिरविला. दोघें पुन्हा शांत बसलीं. कोणी बोलेना.

"इंदु, तूं माझ्याकडे प्रेमानें अतःपर पाहूं शकशील का ? माझा तिरस्कार नाहीं ना करणार ? तुझें प्रेम थोर आहे. तूं मला पदरांत घे. घेशील ?" संपतरायानें एखाद्या मुलाप्रमाणें विचारलें.

"तुम्ही इतक्या वर्षांनीं का होईना, परंतु मजजवळ सत्य सांगितलेंत हा तुमचा मोठेपणाच आहे. नाहींतर ही गोष्ट मला थोडीच कळली असती ? असो. झालें तें झालें. तुम्ही व मी आतां अलग नाहीं. पंधरा वर्षें आपण एकत्र राहिलों. तुम्हांला मी कशी तुच्छ मानूं ? तुम्ही जणुं माझे झाले आहांत. तुमचा तिरस्कार करणें मीं माझाच तिरस्कार करण्यासारखें आहे. जाऊं दे; जगांत निर्दोष कोण आहे ? पापाचा पश्चात्ताप झाला म्हणजे पुरे. परंतु हें जर मला पूर्वीच

सांगितलें असतेंत तर ती सोनी आपण आपल्या घरीं आणली असती. आपण तिला वाढविलें असतें. आपण तिचें कोडकौतुक केलें असतें. आपल्या घरांत तिनें आनंद पसरला असता. देवानें आपणांस मूलबाळ दिलें नाहीं. तें सुख आपणांस नाहीं. ती उणीव भरून निघाली असती. मी तिला कुशींत घेतलें असतें. तिला जेवूं घातलें असतें. तिला न्हाऊंमाखूं घातलें असतें. मातृसुखाचा आनंद मीं लुटला असता. परंतु आतां काय ? असो. आपलें नशीब." असें म्हणून इंदु थांबली.

"आपण मनूबाबाकडे जाऊं व सारें सांगूं. सोनीला घेऊन येऊं. ती येईल. तिला सांगितलें कीं ती येईल." संपतराय म्हणाला.

"जाऊं त्यांच्याकडे." ती म्हणाली.

"आज रात्रीसच जाऊं." तो म्हणाला.

★

प्रकरण आठवें

# सोनीचा नकार

**सोनी** व मनूबाबा प्रेमळपणें गोष्टी बोलत बसलीं होतीं. झोपडींत दिवा होता.

" बाबा, तुम्ही अंगावर घ्या ना ती शाल. आज बाहेर थंडी आहे. घालूं तुमच्या अंगावर ?" प्रेमानें सोनीनें विचारलें.

" तूं ज्या दिवशीं मला सांपडलीस, त्या दिवशीं याच्याहून अधिक थंडी होती आणि तूं लहान असूनहि उवव्यांतून रांगत माझ्या झोपडींत आलीस. माझ्या लहान सोनीला थंडी बाधली नाहीं. मी तर मोठा आहें. आज थंडीहि तितकी नाहीं. मला कशी बाधेल ? " मनूबाबा म्हणाले.

" बाबा, आज सारें सोनें सांपडलें. कल्पनाहि नव्हती. "

" तुझ्या लग्नासाठीं आलें. रामूहि गरीब आहे. तुला आतां दोन दागिने करतां येतील. तुला आवडतात कीं नाहीं दागिने ?"

" मला फुलें आवडतात. आतां आपली बाग लवकर तयार करायची. आमच्या लग्नाला आमच्या बागेंतील फुलें. त्या फुलांना आईच्या श्वासोच्छ्वासाचा सुगंध येईल. आईचे आशीर्वाद त्या फुलांतून मिळतील. नाहीं बाबा ?" तिनें सद्गदित होऊन विचारलें.

" होय बेटा. आईच्या आशीर्वादाहून थोर काय आहे ? मरतां मरतां तिनें स्वतःचें लुगडें फाडून तें तुझ्याभोंवतीं गुंडाळून ठेवलें होतें. जणुं तिनें आपलें प्रेम तुझ्याभोंवतीं गुंडाळून ठेवलें. आई मेली. परंतु तिचें प्रेम मागें राहिलें. प्रेम अमर आहे. त्या प्रेमाची स्मृतिहि आपलें पोषण करीत असते. त्या प्रेमाच्या स्मृतीनें उत्साह येतो, सामर्थ्य येतें. आपणांस निराधार असें वाटत नाहीं." मनूबाबा बोलत होते.

" बाबा, तुम्ही रामूच्या आईजवळ बोललेत का ? रामूची आई किती मायाळू आहे ! त्या दिवशीं माझें जरा डोकें दुखत होतें, तर लगेच त्यांनीं तेल चोळलें. किती तरी त्या माझें करितात."

" साळूबाई खरेंच थोर आहेत. त्यांनीं मला कितीदा तरी धीर दिला आहे. तूं लहानपणीं कधीं आजारी पडलीस, तर त्या लगेच यायच्या. औषध उगाळून द्यायच्या. तुला त्यांनीं न्हाऊंमाखूं घातलें आहे. तुझें सोनी नांव त्यांनींच सुचविलें. साळूबाईसारखी सासू मिळणें म्हणजे पूर्वपुण्याईच हवी. मी अद्याप त्यांच्याजवळ बोललों नाहीं. परंतु बोलेन. साळूबाई नाहीं म्हणणार नाहींत. त्यांचें तुझ्यावर प्रेम आहे. जसा रामू, तशी त्यांना तूं. तूं सर्वांना आवडतेस." मनूबाबांनीं सोनीच्या केसांवरून हात फिरवीत म्हटलें.

झोपडींत अशीं बोलणीं चाललीं होतीं. तिकडे संपतराय व इंदुमती झोपडीकडे येण्यासाठीं बाहेर पडत होतीं. घोड्याची गाडी तयार झाली. तींत तीं दोघेंजणें बसलीं. संपतरायाच्या हातांत इंदुमतीचा हात होता. कोणी बोलत नव्हतें. गाडी निघाली. रात्रीच्या वेळेला तो टापू टापू आवाज घुमत होता. कोणी कोणी घरांतून डोकावून पाहात होते. " जात असतील फिरायला. घरांत करमत नसेल. मूल ना बाळ." असें कोणी म्हणत होते.

झोपडीच्या दाराशीं गाडी थांबली. सोनी व मनूबाबा चकित झालीं. कोणाची गाडी ? रात्रीच्या वेळीं कोण आलें असेल ? आपल्याकडे का कोणी आलें आहे ? का वाटेचा कोणी प्रवासी आहे ? इतक्यांत झोपडीच्या दारावर टकटक आवाज झाला. सोनी पटकन् उठली व दाराजवळ गेली. तिनें " कोण आहे ? " म्हणून विचारिलें.

" मी संपतराय." उत्तर आलें.

सोनीनें लगबगीनें दार उघडलें. दारांत संपतराय व इंदुमती उभीं ! म्हातारा मनूबाबा उठला. सोनीनें पटकन् बैठक घातली. एक आराम-खुर्ची होती व दुसरी एक खुर्ची होती. त्या दोन्ही खुर्च्या पुढें करण्यांत आल्या.

" बसा." मनूबाबा आदरानें म्हणाला.

" तुम्हीहि बसा. बस सोन्ये." संपतराय प्रेमानें म्हणाले.

" सोन्ये, दार लाव बेटा." इंदुमती म्हणाली.

" आज हवेंत गारठा आहे." म्हातारबाबा म्हणाले.

" तुमच्या झोपडींत तर अधिकच थंडी लागत असेल आणि भरपूर पांघरूणहि नसेल. खरें ना सोन्ये ?" संपतरायानें विचारलें.

" आम्ही चुलींत विस्तव ठेवतों. त्यामुळें ऊब असते आणि बाबांचें प्रेम आहे ना. त्यांनीं नुसता हात माझ्या पाठीवरून फिरविला तरी थंडी पळते. प्रेमाची ऊब ही खरी ऊब." सोनी म्हणाली.

" आणि तुम्हीहि मधूनमधून मदत करतां. सोनीची चौकशी करतां. मीं तिच्यासाठीं घेतलें आहे पांघरूण. तुम्ही किती उदार. खरोखरच तुमची श्रीमंती तुम्हांला शोभते. तुमची श्रीमंती म्हणजे जगाला शाप नसून जगाला आशीर्वाद आहे. वास्तविक सोनी कुठची कोण. एका अनाथ स्त्रीची अनाथ मुलगी. लोक तर अशांचा तिरस्कार करतात. परंतु तुम्ही त्या दिवशीं स्वतः सोनीला आपल्या घरीं बाळगण्यास तयार झाले होतेत. मला ती गोष्ट आठवते आहे. पंधरा-सोळा वर्षें झालीं. त्या वेळेस मीं सोनीला घट्ट धरून म्हटलें, 'नाहीं. मी ती कोणांला देणार नाहीं. ती माझ्याकडे आली, माझी झाली.' तुम्हीं 'बरें' म्हटलेंत. तत्काळ दहा रुपये मदत म्हणून दिलेत आणि नेहमीं चौकशी करतां. थोर आहांत तुम्ही. सोनी तुम्हीं नेली असतीत तर माझी काय दशा झाली असती ? सोनीमुळें माझ्या जीवनांत आनंद आला. माझा पुनर्जन्म झाला. हीं पंधरा वर्षें किती सुखांत गेलीं ! तीं पहिलीं पंधरा वर्षें व हीं नंतरचीं पंधरा वर्षें; दोघांत किती फरक ? सोनीनें मला कृतार्थ केलें." मनूबाबा प्रेमानें सोनीच्या पाठीवरून हात फिरवून म्हणाले.

" सोनीनें तुम्हांला कृतार्थ केलें. आतां आम्हांला कृतार्थ करूं दे." संपतराय म्हणाले.

" म्हणजे काय ?" म्हाताऱ्यानें भीतभीत विचारिलें.

" मनूबाबा, आज इतक्या रात्रीं आम्हीं दोघें तुमच्याकडे कां आलों माहीत आहे ? आहे कांहीं कल्पना ?"

" थंडी पडली आहे. सोनीला पांघरूण वगैरे आहे कीं नाहीं पाहायला आले असाल. किंवा देण्यासाठीं बरोबर एखादें लोंकरीचें पांघरूण घेऊन आले असाल किंवा दुसरी कांहीं मदत घेऊन आले असाल." मनूबाबा म्हणाला.

" सोनीला माझें सारेंच देण्यासाठीं मी आलों आहें. पांच-दहा रुपयांची मदत किती दिवस पुरणार ? एखादें पांघरूण किती पुरें पडणार ! सोनीला नेण्यासाठीं मी आलों आहें. सोनी. आमच्याकडे येऊं दे. आमच्याकडे कायमची राहूं दे. सुंदर कोवळी मुलगी. तिला गरिबीचा गारठा नको. रानांत फूल फुलतेंच. परंतु बागेंत अधिक चांगलें फुलतें. बागेंतील फुलाच्या पाकळ्या मोठ्या टपोऱ्या दिसतात. त्याला सुवास अधिक येतो. कारण बागेंत नीट वाढ होते. सोनीची नीट वाढ होऊं दे. तिला शिकूं दे. मी पंतोजी ठेवीन. तो तिला शिकवील. तसेंच भरतकाम वगैरे शिकवायला एक बाई ठेवीन. सोनी कुशल होऊं दे. हुशार होऊं दे. तिचा नीट विकास होऊं दे. मनूबाबा, तुम्ही नाहीं म्हणूं नका. इतके दिवस सोनीचें तुम्हीं केलेंत. आतां आम्हांला करूं दे. इतके दिवस तुम्हीं घरांत मूल असल्याचा आनंद उपभोगलांत. सोनीचे आईबाप झालांत. आतां आम्हांला होऊं दे तिचे आईबाप. आमच्याहि घरांत मूलबाळ नाहीं. सोनी आमची मुलगी होऊं दे. सुखांत वाढूं दे. पुढें तिचें लग्न करूं. मोठ्या घराण्यांत देऊं. अंगावर हिऱ्यामोत्यांचे दागिने पडतील. घरांत गडीमाणसें कामाला असतील. फिरायला जायला घोड्याची गाडी असेल. फुलांच्या बागा असतील. फळांच्या बागा असतील. सोनी जशी राजाची राणी होईल. मनूबाबा, असे कां खिन्न दिसतां ? मी सांगतों याचा तुम्हांला नाहीं आनंद होत ? सोनी एखाद्या गरिबाच्या घरीं पडावी असें का तुम्हांला वाटतें ? तिचे हात काबाडकष्ट करून दमावेत असें का तुम्हांस

वाटतें ? तिच्या अंगावर सुंदर वस्त्रें नसावींत, दागदागिने नसावेत असें का तुम्हांस वाटतें ? सोनी सुखांत नांदावी असें तुम्हांला नाहीं वाटत ?" संपतराय थांबला.

"सोन्ये, तूं सारें ऐकतच आहेस. मी तुझ्या सुखाच्या आड कशाला येऊं ? तुला गरिबीचा वारा लागावा असें मी कसें म्हणूं ? माझ्या स्वार्थासाठीं मीं तुला कशाला दुःखी करूं ? मी एकटा राहीन. एकटा होतों, एकटा राहीन. माझ्यासाठीं तुला नको त्रास, तुला नकोत कष्ट. जातेस त्यांच्याकडे ? माझी आडकाठी नाहीं. असें नको कोणी म्हणायला, कीं म्हातारा मनूबाबा सोनीच्या सुखाच्या आड आला. माझी सोनी कोठेंहि असो परंतु सुखांत राहो. माझें काय ? मी पिकलें पान झालों. आतां केव्हां गळून जाईल त्याचा नेम नाहीं. जे दोन दिवस जगून या जगांत काढायचे असतील ते एकटा राहून काढीन. सोन्ये, काय आहे तुझा विचार ? तुला आतां सारें समजतें. तूं मोठी झाली आहेस. तूं काय तें त्यांना सांग. ते उदारपणें बोलावीत आहेत. जातेस ?" मनूबाबांनीं विचारलें.

"मी नाहीं जात. तुम्हांला सोडून कोठें मी जाऊं ? ही झोपडी म्हणजेच माझा राजवाडा. येथें माझीं सारीं सुखें आहेत. या झोपडींत साऱ्या गोड आठवणी. झोपडींत आहे तें राजवाड्यांत नाहीं. मला कामाचा कंटाळा नाहीं. रामू काम करतो. काम करणारा का कमी दर्जाचा ? काम करतो तोच खरा मनुष्य. देवानें मला चांगले हातपाय दिले आहेत. ते का पुजून ठेवूं ? मला गडीमाणसें नकोत, दासदासी नकोत. सुंदर वस्त्रें नकोत, दागदागिने नकोत. चार फुलें केसांत घातलीं कीं पुरे. मला नको श्रीमंती. बाबा, तुमच्याजवळच मला राहूं दे. तुम्हीच माझें सारें सुख." सोनी म्हणाली.

"आणि आम्ही नाहीं का कोणी तुझीं ? सोन्ये, ऐक. हे मनूबाबा तुझे मानलेले बाबा आहेत. परंतु तुझे बाबा तुझ्या समोर आहेत. मी तुझा पिता. तुझा जन्मदाता. पंधरा वर्षांपूर्वी तूं या झोपडींत आलीस,

त्या वेळेसच तुला मी नेत होतों. परंतु नेतां आलें नाहीं. आज पंधरा वर्षांनंतर पुन्हा तुला न्यायला आलों आहें. तुझ्या पित्याकडे तूं नाहीं येणार ? जन्मदात्याचें नाहीं ऐकणार ? " संपतराय भावनावश होऊन बोलत होते.

खोलींत गंभीर शांतता पसरली होती. सोनीच्या डोळ्यांत पाणी आलें. तिनें आपले डोळे पुसले. आतां ते डोळे निराळे दिसूं लागले. त्या डोळ्यांत कठोरता आली. एक प्रकारचें सात्त्विक अशा संतापाचें तेज आलें. तिनें आपला ओठ थोडा चावला. ती जरा क्रुद्ध दिसूं लागली. परंतु अद्याप वाणी बाहेर पडत नव्हती. संमिश्र भावनांचा सागर उसळला होता. इतक्यांत इंदुमती शांतपणें म्हणाली, "सोन्ये, तूं ऐक. पित्याचें ऐक. पित्याला सुख देण्यासाठीं चल. आज इतकीं वर्षें त्यांचा जीव कसा गुदमरला असेल तें ध्यानांत आण. किती मानसिक दुःखं, मानसिक यातना त्यांनीं भोगल्या असतील ? तूं त्यांची असून त्यांच्यापासून दूर होतीस. त्यांची सारी संपत्ति तुझी असून तुला फार तर मधूनमधून ते मदत देत. त्या वेळेस त्यांच्या मनाला किती दुःख होत असेल ! आपण सुखांत आहोंत, चांगलें खातपीत आहोंत, गाडीघोड्यांतून हिंडत आहोंत, परंतु आपली मुलगी तिकडे गरिबींत आहे या विचारानें तुझ्या पित्याला काय वाटत असेल ? झालें तें झालें. आतां तरी तुझ्या पित्याकडे ये. त्यांच्या मनाला शांति-समाधान दे. मलाहि तुझी आई होऊं दे. मला मूल ना बाळ. तूं आमची, आतां खरोखरची आमची हो. नाहीं म्हणूं नको. आमचें मोठें घर आनंदानें भर. गाणें गायला शीक, पेटी वाजवायला शीक. एवढें मोठें घर, परंतु मुलांशिवाय ओस दिसतें. तूं ये, म्हणजे घरांत प्रकाश येईल, संगीत येईल, एक प्रकारची मधुरता पसरेल. आमचा संसार सुखाचा व गोड होईल. सोन्ये, नाहीं म्हणूं नको. आमचें ऐक. तुझ्या पित्याचें ऐक. जगांत आईबाप म्हणजे थोर दैवतें. तुझी आई गेली. परंतु सुदैवानें पिता आहे. तो पिता तुझ्यासमोर बसला आहे. इतक्या

वर्षांनीं आपला पिता आपणांला भेटला याचा तुला आनंद नाहीं होत ? तुझें हृदय उचंबळत नाहीं ? जगांत पित्याचें नाहीं ऐकायचें तर कोणाचें ऐकायचें ! मनूबाबांची तुझ्यावर सत्ता आहे. परंतु जन्मदात्या पित्याची अधिक आहे."

सोनी एकदम उसळून म्हणाली, "जन्मदात्यापेक्षां या प्राणदात्याची अधिक आहे. जन्मदात्यानें जन्म दिला व जगांत उघडें ठेवलें. माझ्या आईला जगांत उघडें ठेवलें. मनूबाबांनीं माझें सारें केलें. त्यांनीं आज पंधरा वर्षें मला वाढविलें. लहानाचें मोठें केलें. मला जरा बरें वाटतनासें झालें तर मनूबाबा कावरेबावरे होत. मी त्यांच्या अंगाखांद्यावर मुतलें असेन, हगलें असेन. त्यांनीं तें सारें सहन केलें. त्यांनीं माझी परकरपोलकीं धुवावीं, मला आवडणारी भाजी करावी. त्यांनीं मला शिकवावें, गोष्टी सांगाव्या. त्यांनीं माझें काय केलें नाहीं ? माझ्या शरीराची, मनाची, बुद्धीची, हृदयाची वाढ त्यांनीं केली. माझ्या जीवनाची बाग त्यांनीं फुलविली. त्यांना का आतां सोडूं ? रोपटें लहान असतें, तेव्हांच उपटून दुसरीकडे लावलें तर तें जगतें. परंतु जून झालेलें झाड उपटून दुसरीकडे लावूं पाहाल तर तें मरेल. मी लहान होतें, अनाथाप्रमाणें हात पसरीत या गांवांत आलें, या गांवांत रांगत आलें, त्या वेळेसच तुम्हीं मला कां नेलें नाहीं ? तुम्हीं नेत होतेत, परंतु एक अनाथ मुलगी म्हणून नेत होतेत. 'ही माझी मुलगी आहे, आणि ही मरून पडलेली माझी पत्नी आहे' असें त्या वेळेस जगाला कां सांगितलेंत नाहीं ? ही माझी मुलगी आहे असें म्हणतेत तर मनूबाबांनीं हट्ट धरला नसता. परंतु तसें म्हणण्याचें तुम्हांला धैर्य झालें नाहीं. ज्या मुलीला जन्म दिला, ती माझी मुलगी असें जगाला सांगण्याची तुम्हांला लाज वाटली. कां वाटली लाज ? माझ्या आईला पत्नी म्हणून येथें कां आणलेंत नाहीं ? त्या तुमच्या मोठ्या वाड्यांत कां आणलें नाहींत तिला ? तिला आणतेत तर मी तुमच्या मांडीवर खेळल्यें असतें. आणखीही सुंदर भावंडें मला मिळालीं असतीं. तुमचें

घर गोकुळासारखें भरलेलें दिसलें असतें. परंतु तुम्हीं माझ्या आईला फसवलेंत. तिचें रूप पाहून भुललेत. परंतु ' ही माझी पत्नी ' म्हणून जगाला सांगायला लाजलेत. तुम्ही खानदानी घराण्यांतील. माझी आई गरीबाची. मोलमजुरी करणाऱ्या कुळांतील. म्हणून तुम्हांला लाज वाटली. प्रेमापेक्षां कुळाची व धनाची खोटी प्रतिष्ठा तुम्हांला अधिक मोलाची वाटली. काय करायची ती श्रीमंती ? चुलींत घाला ती श्रीमंती. जी श्रीमंती माणुसकी ओळखीत नाहीं, प्रेमाला ओळखीत नाहीं, कर्तव्य ओळखीत नाहीं, ती श्रीमंती पै किंमतीची आहे. त्या श्रीमंतीची मी कशाला वांटेकरीण होऊं ? मीहि मग पैशाला मोठें मानायला शिकेन व माणुसकी पायांखालीं तुडवीन. मी मग रामूजवळ लग्न करायला होईन का तयार ?"

" रामूजवळ लग्न ? त्या सखारामाच्या मुलाशीं ?" संपतरायानें आश्चर्यानें विचारलें.

" हो रामूजवळ. तो गरीब आहे. त्याचा बाप गरीब आहे. परंतु त्यांचीं मनें फार श्रीमंत आहेत. त्या रामूजवळ मी लग्न लावणार आहें. तुम्ही द्याल का त्या गोष्टीला संमति ? तुम्हांला मोठें घराणें हवें. मोठे तेवढे खोटे. मी काय नुसतीं मोठीं घरें पाहूं ? मोठे मोठे खांब व तुळया पाहूं ? का अंगाखांद्यावरचे नुसते दागिने कुरवाळीत बसूं ? मनूबाबा नसत का पूर्वी मोहरा मोजीत बसत, मोहरा पोटाशीं धरून नाचत ? परंतु त्यांत होतें का त्यांना समाधान ? समाधान माणुसकींत आहे, निर्मळ प्रेमांत आहे. खोटे अहंकार, धनाचे व कुळाचे गर्व, ते काय कामाचे ? श्रीमंतांचें रक्त का निराळें असतें ? श्रीमंत मेले तर त्यांच्या शरीरांची कस्तुरी होते आणि गरीब मेले म्हणजे त्यांच्या देहाची केवळ माती होते असें का कोठें आहे ? सारे मातीचेच पुतळे. किंमत असेल तर ती फक्त या मातीच्या मडक्यांत असणाऱ्या मोठ्या मनाची, प्रेमळ हृदयाची, उदार विचारांची. मला तुमची श्रीमंती नको. मला येथें या झोपडींत सारें सुख आहे. या झोपडींतील उपासमारहि तुमच्या श्रीमंतींतील

मेजवान्यांपेक्षां गोड आहे. या झोपडींतील अणुरेणु प्रेममय आहे, कर्तव्यमय आहे. हा माझा स्वर्ग सोडून कोठें येऊं मी ? येथेंच मी राहीन. माझ्या मनूबाबांजवळ राहीन. तेच माझे खरे आईबाप. त्यांचाच माझ्यावर अधिकार. त्यांचीच माझ्यावर सारी सत्ता. त्यांना का म्हातारपणीं सोडूं ? मी का कृतघ्न होऊं ? उद्यां त्यांना काय वाटेल ? मी गेल्यें तर ही झोपडी त्यांना खायला येईल. जरा मी डोळ्यांआड झाल्यें, तर भिरिभिरी हिंडतात व मला शोधतात. त्यांना काय वाटेल ? त्यांना म्हातारपणीं का रडवूं ? त्यांचे उरलेले थोडे दिवस, ते का दुःखांत दवडायला लावूं ? आतांच तर माझी त्यांना जरूरी. मीहि आतां मोठी झाल्यें आहें. आतां मी स्वयंपाक करीन, त्यांना आवडतील ते पदार्थ करीन. आतां मी केर काढीन, भांडीं घाशीन, त्यांचे कपडे धुवीन. त्यांना कढत पाणी आंघोळीला देईन. आतां मी त्यांचे अंथरूण घालीन. त्यांचें भक्तिप्रेमानें पाय चेपीन. एखादें चांगलें पुस्तक रात्रीं त्यांना वाचून दाखवीन. त्यांचा हात धरून त्यांना फिरायला नेईन, त्यांना दोन सुवासिक फुलें तोडून देईन. माझ्या बाबांचें उरलेलें आयुष्य सुखांत जावो. येथेंच मी राहीन, माझ्या बाबांजवळ राहीन. कुठेंसुद्धां जाणार नाहीं त्यांना सोडून." असें म्हणून सोनीनें मनूबाबांच्या गळ्याला मिठी मारली. म्हाताऱ्याच्या डोळ्यांतून धारा लागल्या होत्या.

"सोन्ये, तुझें म्हणणें खरें आहे. रहा हो. येथेंच रहा. तुझ्या पित्याला क्षमा कर. त्यांच्याविषयीं फार कठोर भाव मनांत नको बाळगूं. आपण सारीं मर्त्य माणसें. पदोपदीं चुकणारीं व घसरणारीं. असो. सुखी रहा. कोठेंहि अस, पण सुखी रहा. आम्ही मधूनमधून कांहीं पाठविलें तर तें घेत जा. आम्हांला अगदीं परकें नको समजूं. हृदयांत थोडीशी जागा तुझ्या पित्यासाठीं ठेव. मनूबाबा, तुमचें उरलेलें आयुष्य सुखांत जावो. राग नका धरूं तुम्ही कोणी. क्षमा करा. येतों आम्ही. चला; उठा." इंदुमती पतीचा हात धरून म्हणाली.

संपतराय उठला. पत्नीनें त्याचा हात धरला होता. तिनें दाराची कडी काढली. बाहेर गाडींत गाडीवान झोपीं गेला होता. परंतु तो एकदम दाराचा आवाज ऐकून जागा झाला. त्याला लाज वाटली. तो एकदम उठून उभा राहिला. धनी व धनीण गाडींत बसलीं. मनूबाबा व सोनी दारांत उभीं होतीं. निघाली गाडी. चाबूक वाजला. घोड्यांचा टाप टाप आवाज रात्रीच्या शांत वेळीं घुमत होता. "फिरून आल्या श्रीमंतांच्या स्वाऱ्या" जागे असणारे म्हणाले. टाप टाप आवाज आतां दूर गेला. ऐकूं येईनासा झाला. मनूबाबा व सोनी दोघें घरांत आलीं. त्यांनीं दार लावलें. सोनीनें म्हाताऱ्याच्या गळ्याला एकदम मिठी मारली. तिला अश्रू आवरत ना. आणि म्हाताऱ्या मनूबाबांनाहि पुन्हा जोराचा हुंदका आला. हळुहळू भावना ओसरल्या. बोलायला अवसर झाला.

"बाबा तुम्हांला मी कधींहि सोडणार नाहीं."

"होय हो बाळ. तूं गुणांची आहेस."

★

प्रकरण नववें

# सोनीचें लग्न

**मनूबाबांच्या** झोपडीजवळ बाग तयार झाली. बागेला दगडांचें सुंदर कुसूं घालण्यांत आलें होतें. बागेंत विहीर खणण्यांत आली. तिला पाणीहि भरपूर लागलें. बागेची नीट आंखणी करण्यांत आली. फुलझाडें लावण्यांत आलीं. लवकर फुलराण्या फुलझाडांचे ताटवे शोभूं लागले. लतामंडपहि करण्यांत आले. त्यांच्यावर वेल सोडण्यांत आले. बागेच्या मध्यभागीं ती पवित्र जागा होती. तिच्या भोवतीं फुलझाडें लावण्यांत आलीं होतीं. मध्यें ती हिरवी जागा शोभे. हळुहळू बागेला रंग येत होता.

रामूला ज्या वेळीं इतर ठिकाणीं काम नसे, त्या वेळेस तो बागेंत काम करी. कधीं कधीं तो पहाटे उठे व बागेंत येई. तेथें तासभर खपून मग दुसऱ्यांच्या कामावर जाई. एके दिवशीं सोनी बाहेर झुंजुमुंजु आहे तोंच बागेंत आली. तेथें येऊन पाहाते, तों रामू फुलझाडांना पाणी घालीत आहे !

" रामू, तूं केव्हां आलास ? "

" तुझ्या आधीं आलों. सोनीची बाग सुंदर झाली पाहिजे. "

" ही बाग का फक्त सोनीची ? ती रामूची नाहीं का ? "

" दोघांची आहे. "

" रामू, माझ्यासाठीं तूं दमतोस. माझे मनोरथ पुरावे म्हणून सारखी खटपट करतोस. दिवसभर इतर ठिकाणीं काम करून पुन्हा बागेंत काम करायला येतोस. "

" इतर ठिकाणचा थकवा येथें मी विसरून जातों. येथें माझा सारा आराम, येथें माझा विसांवा. येथील कामानें मी दमत नाहीं, उलट अधिक उत्साह येतो. "

" रामू, त्या जागेजवळ येतोस ? "

" चल. "

दोघें त्या मध्यवर्ति जागेजवळ आलीं. सोनी हात जोडून उभी राहिली. रामूनेंहि हात जोडले. कोणी बोललें नाहीं. थोडया वेळानें सोनी म्हणाली, " चला आतां जाऊं. "

" येथें लवकरच सुंदर फुलांचे ताटवे दिसतील आणि मी मुद्दाम रंगारंगाचीं फुलें या हिरव्या गवतांतून लावणार आहें. पाहातांच डोळे सुखावतील. " रामू म्हणाला.

" तुला आज कामावर नाहीं जायचें ? "

" जायचें आहे तर. "

" मग आमच्याकडे भाकर खाऊन जा. मी ताजी करून देत्यें. येतोस ? "

" आतां तुझ्याच हातची भाकर नेहमीं खायची आहे. "

" परंतु नेहमीं खाण्याला मिळण्यापूर्वी मधूनमधून खाऊन बघ. कशी लागते बघ. माझी परीक्षा घे. "

" परीक्षा कधींच घेतली आहे. परीक्षेंत पास आहेस. "

" कितवा नंबर ? "

" पहिला. "

" आणखी कोणाची परीक्षा घेतलीस ? "

" कोणाची नाहीं. सोन्ये, तूं चावट आहेस. चल लवकर. "

सोनी व रामू घरीं आलीं. मनूबाबा चूल पेटवून शेकत बसले होते.

" इतक्या थंडींत सोन्ये तूं कशाला उठतेस ? " त्यांनीं विचारलें.

" आम्हांला नाहीं थंडीबिंडी. " ती हसत म्हणाली.

" बागेंत गेली होतीस. होय ग ? "

" हो. आणि आतां रामूला भाकर करून देत्यें. तो ताजीताजी

भाकर खाईल व कामाला जाईल. बाबा, तुम्ही जरा दूर होतां ? चुलीवर तवा टाकतें."

मनूबाबा दूर झाले. सोनीनें पीठ घेतलें. तव्यावर भाकरी पडली. दुसऱ्या भाकरीला थोडें पीठ हवें होतें.

" रामू, थोडें पीठ घालतोस त्यांतलें ?"

" हो."

त्यानें पीठ घातलें. परंतु एकदम अधिक पडलें.

" हें पहा ! इतकें कशाला ? चार भाकऱ्या होतील. फार भूक लागली वाटतें ?" हसून सोनीनें विचारलें.

" मी एकटाच भाकर खाऊं ? माझ्याबरोबर तूंहि खा. दोघांसाठीं पीठ. तूं एकट्या रामूची काळजी घेतेस. परंतु रामू दोघांची घेतो. खरें ना ?" तो हसून म्हणाला.

" बाबा, तुम्हींहि थोडी कढत कढत भाकर खाल आमच्याबरोबर ? तव्यावर पिठलें करीन. आपण खाऊं." सोनीनें विचारलें.

" खाईन तुमच्याबरोबर. उजाडत खाण्याची मला म्हाताऱ्याला लाज वाटते. परंतु सोनीबरोबर खाण्यांत गंमत आहे." मनूबाबा म्हणाले.

भाकऱ्या झाल्या. तिघें खायला बसलीं. इतक्यांत रामूची आई साळूबाई आली.

" हें काय रे रामू ? कामावर नाहीं का जायचें ? येथें खात काय बसलास ? घरीं भाकर केली आहे ना !" ती म्हणाली.

" येथें खाल्लेन म्हणून काय झालं ?" मनूबाबा म्हणाले.

" तुम्हीं परके नाहीं मनूबाबा. परंतु घरीं सांगायला नको का ? मी आपली वाट बघत्यें केव्हांची. आणि सोन्यें, इतक्या उजाडत उठून कशाला ग भाकऱ्या करीत बसलीस ?" साळूबाईनें प्रेमानें विचारलें.

" रामूबरोबर भातुकली करण्यासाठीं. त्याला दिवसभर असतें काम.

माझ्याबरोबर भातुकली खेळायला त्याला वेळ कोठें आहे? म्हणून आज सकाळींसच करूं म्हटलें." सोनी हसून म्हणाली.

"भातुकली खेळायला तुम्हीं का आतां लहान?" तिनें विचारलें.

"मग का आम्ही मोठीं झालों?" सोनीनें विचारलें.

"नाहीं वाटतें? आतां लग्न हवें करायला तुझें. समजलीस ग सोन्ये. लहान नाहींस हो आतां. उद्यां सासूकडे गेलीस म्हणजे स्वतःला लहान समजशील व झोपून राहाशील. सासू मग बोलेल. रागावेल." साळूबाई म्हणाली.

"मारणार नाहीं ना?" हसून सोनीनें विचारलें.

"मारील सुद्धां. कांहीं कांहीं सास्वा खाष्ट असतात हो सोन्ये. तयार रहा. लाड नाहीं मग तेथें चालायचे!" रामू म्हणाला.

"पण मी अशी सासू मिळवीन, जी माझी जणूं आई होईल. मी थंडींत लवकर जायला लागलें तर जी म्हणेल, कीं नीज हो जरा आणखी, लहान आहेस तूं." सोनी म्हणाली.

"अशी सासू मिळायला पुण्याई लागते." रामू म्हणाला.

"आहेच माझी पुण्याई. आणि माझी पुण्याई नसली तरी मनूबाबांची आहे. माझ्या आईचा आशीर्वादहि माझ्याजवळ असेल. नाहीं का हो बाबा?" सद्गदित होऊन सोनीनें विचारलें.

"आहे हो तुझ्या आईचा आशीर्वाद." म्हातारा म्हणाला.

"रामू, जा आतां कामावर. वेळ झाली." साळूबाई म्हणाली.

रामू निघाला. सोनी त्याला दारापर्यंत पोंचवायला गेली. रामू मागें वळून पाहात होता. सोनी तेथेंच उभी होती. रामू वळला, दिसेनासा झाला. तरी सोनी तेथेंच उभी होती.

घरांत साळूबाई व मनूबाबा दोघें होतीं. साळूबाई जायला निघाली, परंतु म्हाताऱ्यानें तिला थांबविलें.

" साळूबाई, जरा थांबा. थोडें बोलूं आपण. " तो म्हणाला.

" घरीं चुलीवर दूध आहे. उतास जाईल. " ती म्हणाली

" सोनीला पाठवूं. ती दूध उतरून ठेवील. " म्हातारा म्हणाला.

" बरें तर. सोने, अग सोन्ये ! " तिनें हाक मारली.

" काय रामूच्या आई ? " सोनीनें येऊन विचारलें.

" आमच्या घरीं जा व तेंवढें चुलीवरचें दूध तापलें म्हणजे उतरून ठेव. झाकून ठेव. भाकऱ्याहि झाकल्या नसतील तर झाकून ठेव. मी लवकरच येत्यें म्हणून त्यांना सांग. त्यांना थोडा चहा हवा असला तरी करून दे. अलीकडे त्यांना जरा दमा लागतो. तुला येतो कीं नाहीं करतां ? " साळूबाईनें विचारलें.

" हो. देईन करून. जाऊं मी ? जातें हं बाबा. " असें म्हणून ती गेली. आतां तीं दोघेंच तेथें होतीं. मोकळेपणें बोलतां आलें असतें.

" काय बोलणार आहांत मनूबाबा ? " साळूबाईनें विचारिलें.

" सोनी आतां मोठी झाली. तिचें लग्न नको का करायला ? "

" हवें करायला. मी कधींच तुम्हांला म्हणणार होत्यें. पण म्हटलें, कीं तुम्हांला वाईट वाटेल. सोनी सासरीं गेली, कीं तुम्ही एकटे राहाल. सोनीच्या दूर जाण्याचा विचारहि तुम्हांला सहन होणार नाहीं. परंतु आतां हवें हो करायला लग्न. सारें रीतीनें वेळींच झालें पाहिजे. नाहीं का ? "

" हो. अलीकडे हाच विचार माझ्या मनांत येत असतो. परंतु मी म्हातारा. कोठें जाऊं नवरा शोधायला ? तुम्ही सांगतां का एखादें स्थळ ? तुमच्या आहे का माहितींत एखादा मुलगा ? "

" तसा डोळ्यासमोर नाहीं. आणि सोनीला चांगलेंसें स्थळ पाहायला हवें. तिला गरिबावरीं थोडीच द्यायची आहे ? तुमच्या मोहराहि परत मिळाल्या आहेत. आतां तुम्ही गरीब नाहीं. खर्च करूं शकाल. सोनी सुस्थळीं पडो. चार दागिने अंगावर पडोत. परंतु अशीं

स्थळें आम्हांला कोठें माहीत असणार ? आम्ही गरीब माणसें. खरें ना मनूबाबा ? " ती म्हणाली.

"हें पहा साळूबाई, नवरा चांगला असला म्हणजे झालें. माणसें चांगलीं असलीं म्हणजे झालें. गरीब का असेना घराणें. माणसें श्रीमंत मनाचीं हवींत. सोनीला मीं प्रेमानें वाढविलें. जरा लडिवाळपणानें बोलते सवरते. तिचें कौतुक करणारीं माणसें मिळालीं म्हणजे झालें. पैसे काय चाटायचे आहेत ? आणि सोनीला नाहीं हो दागदागिन्यांचा सोस. दोन फुलें केसांत घालायला असलीं म्हणजे झालें असें म्हणते. आहे का असें स्थळ माहीत ? गरीब असलें तरी चालेल."

"सांगेन. लक्षांत ठेवीन."

"आतां नाहीं सांगतां येणार ?"

"आतां एकदम कसें कोणतें सांगूं मनूबाबा ?"

"डोळ्यासमोर असेल तें सांगा."

"तसें कसें सांगूं ?"

"साळूबाई, मीच तुम्हांला एक विचारूं ?"

"विचारा ना बाबा."

"तुम्हींच माझ्या सोनीला सून करून घेतां का ? तुमच्या रामूला सोनी द्यावी असें माझ्या मनांत आहे. परंतु तुम्हांला एकदम विचारायला धैर्य झालें नाहीं. विचारीन विचारीन म्हणत होतों. परंतु आज केलें धाडस. बघा. सांगा काय तें."

"कांहीं तरीच बोलतां तुम्ही."

"कांहीं तरी नाहीं. खऱ्या अर्थानें विचारीत आहें. मी एकाच गोष्टीला भितों. ती म्हणजे सोनी कोणाची कोण हें तुमच्या मनांत येईल कीं काय ? सोनी एका अनाथ स्त्रीची मुलगी, तिच्या आईबापांची माहिती नाहीं, असें तुमच्या मनांत येईल का असें मला वाटे. आणि म्हणून तुम्हांला विचारायला धजत नव्हतों. साळूबाई, तुमच्या मनांत असें कांहीं येणार नाहीं असें मला वाटतें. तुमचें मन मोठें आहे.

तुमचें हृदय प्रेमळ आहे. तसें नसतें तर तुम्हीं सोनीला कधीं हात लावलात नसता. तिचे केस विंचरलेत नसतेत, तिला न्हाऊंमाखूं घातलेंत नसतें. तिला जेवायला बोलावलेंत नसतें. आतांच तुम्हीं तिला तुमच्या घरीं पाठवलेंत. दूध उतर, भाकऱ्या झाक, चहा कर वगैरे सांगितलेंत. तुम्हीं सोनीला हीन समजत नसाल. परंतु साळूबाई, हें सारें करणें-सवरणें निराळें आणि प्रत्यक्ष उद्यां सून म्हणून पत्करणें निराळें. कारण जग एखादे वेळेस नांवें ठेवील. आप्तेष्ट नांवें ठेवतील. सारें पाहावें लागतें. परंतु तुम्ही असल्या गोष्टींना महत्त्व देणार नाहीं असें मला वाटतें. सांगा, तुम्हीं काय तें सांगा. रामू व सोनी यांचा जोडा अनुरूप आहे. त्यांचें परस्परांवर प्रेम आहे. त्यांचा संसार सुखाचा होईल आणि तुमच्यासारखी सासू मिळणें म्हणजे खरोखरच पुण्याई हवी. बोला. या म्हाताऱ्याचें स्वप्न खरें करा. माझ्या मनांत किती तरी दिवस खेळवलेले हे मनोरथ पुरे करा. तुमच्या हातांत सारें आहे. रामूचे वडील केव्हांच तयार होतील. तुम्हीं तयार झाल्यात म्हणजे सारें होईल. सांगा साळूबाई."

"मनूबाबा, सोनीच्या जातकुळीचा प्रश्न माझ्या डोळ्यांसमोर कधींहि आला नाहीं. जसा माझा रामू तशी ती. खरें सांगूं का, माझ्यासुद्धां मनांत किती तरी वर्षें हें स्वप्न आहे. पुढेंमागें सोनीला सून करून घेऊं असें मी मनांत म्हणें. त्या दोघांचें परस्परांवर प्रेम आहे हीहि गोष्ट खरी. तीं दोघें लहानपणीं भातुकली खेळत. त्यांचा खेळ मी बघें व मनांत म्हणें, आज लटोपटीचा संसार करीत आहेत. ती त्याला लटोपटीची भाकर वाढीत आहे. परंतु सोनी एक दिवस रामूचा संसार करूं लागेल व त्याला खरोखरची भाकर वाढील. मघां येथें मी आल्यें. सोनी रामूला वाढीत होती. तें पाहून माझ्या मनांत किती कल्पना आल्या. मला जरा गहिंवरून आलें होतें. जणूं दोघांचें देवानें लग्नच लावलें असें वाटलें. परंतु मनाला मीं आवरलें. मनूबाबा, मीच तुमच्याजवळ सोनीसाठीं मागणी घालणार होत्यें. परंतु ज्या दिवशीं तुमच्या मोहरांच्या पिशव्या

परत मिळाल्या, त्या दिवशीं मला एक प्रकारचें जरा वाईट वाटलें. म्हटलें, कीं मनूबाबा आतां श्रीमंत झाले. सोनीचें लग्न आतां थाटानें होईल. तिला मोठ्या घरीं देतील. आतां आपण कशी सोनीला मागणी घालायची? आपण गरीब. आपणांस दागदागिने अंगावर घालतां येणार नाहींत. उंची तलम लुगडीं घेतां येणार नाहींत. आमच्याकडे जाडेभरडे कपडे, भाजीभाकर खायला, गडीमाणसें तर कामाला मिळायचीं नाहींतच, उलट स्वतः गडीमाणसांप्रमाणें राबावें लागेल. कशी घालावी सोनीला मागणी? मी स्वतःवर रागावल्यें. आपल्या रामूला चांगली बायको मिळावी हा माझा स्वार्थ. सोनी सुस्थळीं पडूं दे. तिचे हात कशाला कामांत राबायला हवेत? तिचे हात का आमच्या हातांसारखे राठ करायचे? तिनें का भांडींखरकटीं करावीं, धुणीं धुवावीं, घरें सारवावीं? मनूबाबांना पैसे मिळाले. चांगलें झालें. सोनीचें नशीब थोर. त्याचा आनंद वाटण्याऐवजीं मला जरा वाईट वाटलें. माझी मलो लाज वाटली. पुन्हा असा स्वार्थी विचार मनांत येऊं द्यायचा नाहीं, असें ठरविलें. मनूबाबा, खरोखरच का सोनी रामूला देऊं म्हणतां?"

"खरोखर. सोनीच्या आईची शपथ. लग्नासारख्या पवित्र व मंगल गोष्टी. त्यांची का मी थट्टा करीन? मग ठरलें ना?"

"तुमची इच्छा असेल तर ठरलें. माझी ना नाहीं. माझ्या रामूचें भाग्य. माझीहि पूर्व पुण्याई म्हणून अशी सून मला मिळत आहे."

"मग साखर घ्या व गोड तोंड करून जा."

"कोठें आहे साखर?"

"कशाला साखर?" सोनीनें एकदम येऊन विचारलें.

"तूं आलीस वाटतें? रामूच्या आईचें तोंड गोड कर." मनूबाबा म्हणाले.

"कडू कशानें झालें? ही घ्या साखर." सोनीनें साखर दिली.

"तूं पण खा. मनूबाबांना दे."

"ही कशाची साखर?"



“ कशाला साखर ? ” सोनीने एकदम येऊन विचारलें.

[ पृष्ठ ७४

" तें तुला मागून कळेल. आतां मी जात्यें. "

साळूबाई निघून गेल्या. मनूबाबांनीं सोनीला सारी हकीगत सांगितली. सोनी आनंदली, नाचली. तिचें तोंड फुललें. तिचे डोळे किती सुंदर दिसत होते !

तिन्हीसांजा झाल्या. रामू कामावरून आज घरीं आला नाहीं. सोनी त्याच्याकडे गेली होती. परंतु रामू न दिसल्यामुळें ती हिरमुसली झाली. कोठें गेला रामू ? बागेंत तर नसेल गेला ? परंतु घरीं येऊन मग जातो. मलाहि हांक मारून जातो. परंतु आज का एकटाच गेला ? एकटाच फुलें फुलविण्यासाठीं गेला ? सोनीहि निघाली. ती बागेंत आली. रामू पाणी घालीत होता. सोनी त्याला मदत करूं लागली. पाणी घालून झालें. सोनीनें कांहीं फुलें वेंचून घेतलीं.

" चल रामू, आईच्या जागीं जाऊं. "

" चल. "

दोघें त्या पवित्र प्रशान्त स्थानीं जाऊन बसलीं. स्तब्धता होती. मंद वारा वहात होता. झाडें माना डोलवीत होतीं. तिकडे आकाशांत अनंत रंग पसरले होते.

" रामू, तूं आज असा कां ? "

" मग कसा असूं ? "

" आनंदी अस, तूं हस व मला हसव. "

" सोने, ही बाग आपण फुलवली. "

" किती छान दिसते नाहीं ? "

" परंतु रामूच्या जीवनाची बाग कधीं फुलणार ? किती दिवस वाट बघायची ? "

" रामू ! "

" काय ? "

" सांगूं ? तुझें माझें लग्न ठरलें ! आज तुझी आई व माझे बाबा

यांनीं निश्चित केलें. सकाळीं माझा साखरपुडा झाला. ही बघ तुलाहि साखर आणली आहे. तुला देण्यासाठीं घरीं गेल्यें होत्यें. परंतु तूं इकडे आलास. ही घे साखर व तोंड गोड कर. आतां लवकरच बागा फुलतील. रुसूं नको, रागावूं नको. घे ना. ”

“ माझ्या तोंडांत घाल. ”

“ बरं. ”

सोनीनें रामूच्या तोंडांत साखर घातली. दोघांना अपार आनंद होत होता. सोनीचा हात त्याच्या हातांत होता. कोणी बोलेना.

“ रामू, आपण आईची पूजा करूं. ”

“ ये करूं. ”

दोघांनीं तीं फुलें त्या पवित्र स्थळीं वाहिलीं. दोघांनीं प्रणाम केले.

“ आई, आम्हांला आशीर्वाद दे. आमचें प्रेम अभंग राहो. ” सोनी म्हणाली.

दोघें निघालीं. रामूनें एक फूल तोडून घेतलें व सोनीच्या केसांत घातलें. तिनें एक तोडून घेतलें व त्याच्या कानावर ठेवलें. परस्परांनीं परस्परांस फुलें दिलीं. जणूं निर्मळ व प्रेमळ अशीं स्वतःचीं हृदयें, स्वतःचीं जीवनेंच त्यांनीं एकमेकांस अर्पिलीं.

सोनी व रामू यांचें लग्न ठरलें. साऱ्या रायगांवांत वार्ता पसरली. ‘ रामूचें नशीब थोर ’ असें सर्वजण म्हणूं लागलीं. संपतराय व इंदुमती यांच्याहि कानीं वार्ता गेली. तीं दोघें पुन्हा एकदा मनूबाबांकडे गेलीं. सोनीनें त्यांचें स्वागत केलें.

“ सोन्ये, तुझें लग्न ठरलें ना ? ” इंदुमतीनें विचारलें.

“ हो. रामूशीं ठरविलें. ” मनूबाबांनीं सांगितलें.

" सोन्ये, इतकी लाजतेस काय ? ये. माझ्याजवळ ये. " संपतराय म्हणाले. सोनी संपतरायांजवळ गेली. त्यांनीं तिच्या पाठीवरून, केसांवरून हात फिरविला.

" मनूबाबा, आतां माझी एक तरी प्रार्थना तुम्हीं ऐकली पाहिजे. या लग्नाचा दोहोंकडचा खर्च मी करीन. हें लग्न मी लावीन. एवढी तरी या निराश पितृहृदयाची इच्छा तुम्ही नाहीं का पुरविणार ? सोन्ये, नाहीं म्हणूं नको. कठोर होऊं नको. " संपतराय सकंप आवाजांत म्हणाले.

" जशी तुमची इच्छा. " मनूबाबा म्हणाले.

" परंतु सोनीचें काय म्हणणें आहे ? " सपतरायांनीं विचारलें.

" माझा विरोध नाहीं. मी तुमचें हृदय जाणतें, दुःख समजतें. मनूबाबा माझे आणि तुम्हीहि माझे. " सोनी म्हणाली.

संपतराय व इंदुमती आनंदून गेलीं. मुहूर्त ठरला. मोठ्या थाटानें लग्न झालें. साऱ्या गांवाला पुरणपोळीचें जेवण मिळालें. सारे धन्यवाद व आशीर्वाद देते झाले. सोनी व रामू संपतराय व इंदुमती यांच्या पायां पडलीं. दोघांनीं आशीर्वाद दिले. मनूबाबांनींहि दोघांना पोटाशीं धरलें व आशीर्वाद दिले. साळूबाई व सखाराम यांनींहि वधूवरांस आशीर्वाद दिले.

" सोन्ये, गांवांत ते वृद्ध धोंडीबा आहेत ना, त्यांनाहि नमस्कार करून या. साऱ्या गांवांत ते अधिक वृद्ध आहेत. त्यांना आनंद होईल. " सखाराम म्हणाला.

वधूवरें वृद्ध धोंडीबाकडे गेलीं. धोंडीबा दारांतच होते. सोनी व रामू त्यांच्या पायां पडलीं. धोंडीबानें त्यांना आशीर्वाद दिला. धोंडीबा म्हणाला, " रामूच्या वडिलांना हें असें होणार म्हणून मीं कधींच सांगितलें होतें. म्हाताऱ्याचें म्हणणें खोटें होत नसतें. आमचे डोळे अधू होत चालले तरीहि आम्हांला दूरचें दिसतें. हसतां काय ? सुखानें संसार करा. म्हाताऱ्यांना मान द्या. त्यांची सेवा करा. समजलें ना ? "

सोनी व रामू बागेंत गेलीं. दोवें आईच्या त्या पवित्र स्थानीं उभीं होतीं. दोघांनीं त्या जागेवर भक्तीनें फुलें वाहिलीं. दोघांनीं प्रणाम केले.

"आई, आम्हां दोघांना आशीर्वाद दे." दोवें म्हणालीं.

"सोनीच्या आई, मलाहि क्षमा कर." संपतराय म्हणाले. ते हळूच पाठीमागें येऊन उभे होते. त्यांनीं त्या पवित्र स्थळाला साश्रु प्रणाम केला.

"सोन्ये, रामू, मला परका मानूं नका. माझ्या बागेंतील फुलें तुमचीं आहेत, फळें तुमचीं आहेत. माझ्या घरांतील सारें तुमचें आहे. हक्कानें मागा, नेत जा. त्यांतच आम्हांला आनंद हो सोन्ये. या पवित्र ठिकाणीं मीं सांगत आहें." संपतराय म्हणाले.

"होय बाबा." सोनी म्हणाली.

संपतराय निघून गेले. सोनी व रामूहि हळुहळू निघून गेलीं.

★

रा. क. २९५० नों.
वि. ७।।.८।।.

प्रकरण दहावें

## जन्मभूमीचें दर्शन

सोनी व रामू यांचा नवा संसार सुरू झाला. मनूबाबा आतां काम करीत नसत. मागाचें खटक खटक आतां बंद झालें. त्यांच्या जीवनाचें वस्त्रहि आतां बहुतेक पुरें होत आलें होतें.

एके दिवशीं सायंकाळीं सोनी व मनूबाबा फिरायला गेलीं होतीं. मनूबाबा एका शिलाखंडावर बसले होते. त्यांच्या पायाशीं सोनी होती.

" बाबा, सूर्य मावळला. आतां लवकरच अंधार पडेल. "

" माझाहि जीवनसूर्य आतां लवकरच मावळेल. "

" कां असें म्हणतां बाबा ? आम्हांला कंटाळलेत ? "

" नाहीं बेटा. परंतु एक दिवस बोलावणें येईलच. माझ्या झोपडींतील माग बंद झाला. जीवनाचाहि माग आतां बंद होईल. तुम्हीं सुखानें नांदा. सोन्ये, अलीकडे माझ्या मनांत एक तीव्र इच्छा उत्पन्न झाली आहे. "

" कोणती बाबा ? आम्हीं ती पुरी करूं. "

" इच्छा एवढीच, कीं जन्मभूमि पुन्हा एकदा पाहून यावें. सोन्ये, तीस-पस्तीस वर्षे झालीं. माझी जन्मभूमि सोडून मी या रायगांवीं आलों. मी आलों त्या वेळेस जीवनांत अंधार होता. जगांत न्याय नाहीं, सत्य नाहीं, प्रेम नाहीं, स्नेह नाहीं, देव नाहीं, धर्म नाहीं असें मला वाटूं लागलें होतें. मी माझी जन्मभूमि सोडली. तिचा विचारहि कित्येक वर्षे माझ्या मनांत आला नाहीं. परंतु तूं सारें मला परत दिलेंस, तूं माझ्या जीवनांत पुन्हां प्रकाश आणलास, श्रद्धा आणलीस. माझ्या जन्मभूमीचा निराशेच्या भरांत मीं त्याग केला. आज जीवनांत आशा आहे. तर ती जन्मभूमि पुन्हा पाहून मला येऊं दे. येऊं का जाऊन ? "

" बाबा, कशी आहे तुमची जन्मभूमि ? "

" सुंदर आहे. सायगांव माझ्या जन्मभूमीचें नांव. गांवाभोवतीं सदैव वाहाणारी बहुळा नदी आहे. किती निर्मळ व गोड तिचें पाणी. आमच्या गांवांत भांडणतंटा होत नसे. द्वेषमत्सर नसत. कोर्टकचेरींत कधीं कोणी गेलें नाहीं. 'हा अपराध करणारा, हा पाप करणारा,' एवढेंच देवळांत जमून सर्वजण मिळून पुरावा पाहून ठरवीत. दुसरी शिक्षा नसे. 'पाप करणाराचें मन त्याला खातच असतें. निराळी शिक्षा कशाला,' असें माझा गांव म्हणे. पाहून येईन तो गांव पुन्हा. किती विस्तृत मैदानें, कशी आंबराई, कशीं स्वच्छ सुंदर घरें ! येऊं का जाऊन ? देवाकडे जाण्यापूर्वी एकदा जन्मभूमि पाहून येईन, मातृभूमि पाहून येईन. "

" तुम्हीं का एकटेच जाणार ? "

" एकट्यालाच जाऊं दे. माझ्या भावना, माझ्या स्मृति, तुम्हांला त्यांत मजा वाटणार नाहीं. खरें ना ? "

" मग या जाऊन. परंतु पायीं जाऊं नका. तुम्हीं आतां वृद्ध झालां आहांत. अशक्त आहांत. गाडीघोडा करून जा. तुम्हीं आम्हांला पुष्कळ दिवस हवेत. "

मनूबाबा पुन्हा आपल्या सायगांवला आले. परंतु सायगांव पूर्वीचा राहिला नव्हता.. कोठें आहे ती आंबराई ? कोठें आहेत तीं विस्तृत मैदानें ? आतां जिकडे तिकडे धुराच्या चिमण्या दिसत होत्या. सायगांव उद्योगधंद्यानें गजबजलेलें होतें. सारी गडबड. त्या विस्तृत मैदानांत मोठमोठे कारखाने उघडण्यांत आले होते. आंबराई जाऊन तेथें नवीन घरें बांधण्यांत आलीं होतीं. ठिकठिकाणीं वकिलांच्या पाट्या होत्या. कोर्टकचेरी गांवांत आली होती. मनूबाबांना स्वतःचें घरहि कोठें दिसलें नाहीं. त्यांचा मित्र विनू तोहि दिसला नाहीं. मनूबाबा सर्वत्र पाहात राहिले. त्यांना ओळखीचें कोणी भेटेना आणि त्यांनाहि कोणी ओळखीना. साऱ्या सायगांवांत ते भटकले. शेवटीं ते बहुळा नदीच्या

तीरावर आले. परंतु बहुळेच्या पाण्यांत आतां गांवांतील गटारें सोडण्यांत आलीं होतीं ! ती लोकमाता लेकरांची सारी घाण धुऊन नेत होती. मनूबाबांस वाईट वाटलें. ते हिंडत हिंडत वरच्या बाजूस गेले. जेथें पाणी निर्मळ होतें तेथें गेलें. तेथें ते बसले. बहुळेचें निर्मळ मधुर असें पाणी ते ओंजळीनें प्यायले. त्या बहुळेचेंच पाणी पिऊन ३९ वर्षांपूर्वी ते मध्यरात्रीं निघून गेले होते. पुन्हां तिचें पाणी पिऊन ते उठले. त्यांनीं बहुळेला प्रणाम केला. पुन्हा मनूबाबा उठले. आतां सायंकाळ होत आली होती. अंधार पडूं लागला होता. मनूबाबा गांवांत आले. गांवांत जिकडे तिकडे विजेच्या दिव्यांचा लखलखाट होता. म्हाताऱ्या मनूबाबांचे डोळे दिपून गेले. साथगांवला प्रणाम करून ते परत फिरले.

त्या दिवशीं सायंकाळीं रामू व सोनी फिरायला गेलीं होतीं. तों तिकडून कोणी तरी येत आहे असें त्यांना दिसलें. दोघेंजण ---त गेलीं.

"बाबाच ते."

"चालत येत आहेत."

हो. ते मनूबाबाच होते. पाठीवर लहानसें गांठोडें होतें. हातांत काठी होती. ते वांकले होते. हळुहळू येत होते. सोनी धावतच गेली व तिनें तें गांठोडें घेतलें.

"बाबा, चालत कशाला आलेत ?"

"गाडीनेंच आलों. परंतु गांव दिसूं लागल्यावर उतरलों. गाडी-वानाला दुसरीकडे जायचें होतें. कशाला त्याला हिसका ? आतां सायंकाळ होत आली. मला आतां एकट्यानेंच जायचें आहे. माझ्या पापपुण्याची काठी हातांत घेऊन देवाकडे जायचें आहे. खरें ना ?"

"बाबा, तुमच्या जन्मभूमीहून आम्हांला काय आणलेंत ?"

"कर्तव्य नि प्रेम. या दोन वस्तु मी तुम्हांला देतों. या माझ्या शेवटच्या देणग्या. रामू, सोन्ये, सुखानें संसार करा. जपून वागा. संसार

म्हणजे सर्कशीचा खेळ. तारेवरून चालणें. तोल सांभाळावा लाग
संयमाची छत्री हातांत धरून चाला. म्हणजे तारेवरून पडणार नाहीं
परस्परांस सांभाळा. शेजाऱ्यापाजाऱ्यांना मदत करा. परावलंबी हो
नका. चैन करूं नका. कंजूषपणाहि नको. सारें प्रमाणांत अस
प्रमाणांत सौंदर्य आहे. समजलें ना ? ”

“ बाबा, तुमच्या सांगण्याप्रमाणें आम्हीं वागूं. तुमचा आशीर्व
आम्हांला सांभाळील. ”

“ परंतु तुम्हीं आम्हांला अजून पुष्कळ दिवस हवेत. ” सो
म्हणाली.

“ तें का आपल्या हातीं ? ते बघ दूर दिवे चमकताहेत,
मनूबाबा म्हणाले.

★

IRBK-0102970